# नवरा : एक खोज

चि. सौ. कां. प्रियंका जोशी



ई साहित्य प्रतिष्ठान®

# नवरा : एक खोज

प्रियंका जोशी

ई साहित्य प्रतिष्ठान






पुस्तकाचे नांव नवरा : एक खोज

प्रकार : टाईम-पास

लेखिका : प्रियंका जोशी

joshipriyankaj@gmail.com

मुखपृष्ठ व सजावट : सुनिल सामंत

मुखपृष्ठ कल्पना : सौ. प्रणिता नितिन देशपांडे

प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

*e Sahity Pratishthan*
*eleventh floor*
*eternity, G1102*
*eastern express highway*
*Thane. 400604*
*Ph : 9869674820*

दसरा २०१३ (१३-१०-१३)

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध

आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण किंवा नाटक, सिनेमा, सिरियल, स्टेज शो किंवा तत्सम रुपांतर किंवा भाषांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे.

©esahity Pratishthan® 2013

esahity@gmail.com
www.esahity.com
www.ednyaneshwari.com
www.marathiriyasat.com
etyarth. blogspot. in

# अर्पणपत्रिका

**हे ई-बुक मी माझ्या आई-बाबांना, दोन्ही बहीणींना आणि माझ्या भावाला अर्पण करते. त्यांनी खूप पेशन्टली माझ्या 'नवरा' ह्या खोजमोहीमेत मला मदत केली. .**

**लव्ह यू ऑल**

**प्रियंका**

## प्रस्तावना

नवरा शोधतांना मला आलेल्या असंख्य अनुभवांपैकी काही मी तुमच्यासमोर ह्या ई-बुकच्या माध्यमातून आज मांडत आहे.

जेव्हा नवरा शोधायला सुरूवात केली तेव्हा दोन्ही बहिणींच्या वेळेस आलेले अनुभव पाठीशी होते पण त्याहूनही वेगळं, विचित्र आणि थोड्याफार प्रमाणात विक्षिप्त असं काहीसं माझ्या पदरात पडत गेलं. जे घडतंय ते बदलता किंवा टाळता येणं शक्य नव्हतं पण कुठेतरी हे मात्र वाटलं की ह्या सगळ्याला वाचा फोडायला हवी म्हणून एके दिवशी घेतलं लिहायला . .


ह्या ठिकाणी मला धन्यवाद द्यायची इच्छा आहे त्या सगळ्या प्रोफाईल्सना ज्यांमुळे मला इतके समृध्द अनुभव मिळाले आणि हे पुस्तक साकार होऊ शकलं. नामकाका आणि ई-साहीत्य प्रतिष्ठानचे अगदी मनःपूर्वक आभार ह्या पुस्तकाला इतकं सुंदर रूप देण्याबद्दल आणि सरतेशेवटी गणपती बाप्पाचे आभार की त्याने मला इतक्या खडतर शोधमोहिमेतून माझा नवरा शोधून दिला.

प्रियंका जोशी

या पुस्तकातील सर्व व्यक्तिरेखा, प्रसंग, 'स्थळे' इत्यादी इत्यादी काल्पनिक नसून त्यांचे प्रत्यक्षातील व्यक्ती आणि स्थळांशी साधर्म्य न आढळल्यास तो पूर्णतः योगायोग समजावा.

तसेच या पुस्तकात मांडलेल्या मतांशी प्रकाशक सहमत नसेलच असे नाही.

प्रकाशक






## पूर्वतयारी भाग १

माझं पोस्ट-ग्रॅज्युएशन झालं.

कॅम्पसमधून नोकरी लागली.

मुंबईला शिफ्ट झाले.

जेमतेम सहाच महिने झाले असतील माझ्या नोकरीला, आणि बाबांनी एके दिवशी फोनवर सांगितलं की आता तुझं शिक्षण, नोकरी सगळं व्यवस्थित झालंय तर आपण लग्नाचं बघू.

पहिला विचार माझ्या डोक्यात आला की, ‘ओ गॉड! लग्न! ! इतक्या लवकर! ! नो वे’

मी बाबांना म्हटलं’, “माझी नोकरी पक्की तर होऊ देत मग आपण बघू ना. . ”

काही काळानंतर पुन्हा बाबांनी तोच विषय काढला आणि मला क्लिक झालं की माझी नोकरी पक्की होऊन सुध्दा २ महिने झाले होते. खरंच वेळ इतका भुर्रकन का पळाला?

यावेळेला आता काय कारण द्यावं याचा विचार करेपर्यंत आई-बाबांनी एक एक गोष्ट सांगायला सुरूवात केली. सगळ्यात आधी वधु-वर सूचक मंडळांची यादी वाचली गेली.

कोणतं चांगलं आहे. कोणाकडे सगळयात जास्त स्थळं येतात. कोणाकडे जास्तीत जास्त लग्न कमीत कमी वेळात जुळविण्याचं रेकॉर्ड आहे वगैरे वगैरे

मला खरं तर काही समजतच नव्हतं काय चाललं आहे ते! पण त्या दोघांचं मन नको दुखवायला म्हणून मी, माझ्या दोन्ही मोठया बहिणींसाठी ज्या वधु-वर सूचक मंडळात नाव नोंदवलं होतं तिथेच करूया म्हटलं. दोघेही एकदम खुश झाले आणि पहिली गोष्ट फायनल झाली

लगेच पुढचा प्रश्न आला. नाव नोंदणी करायची म्हणजे फोटो हवाच. हे ऐकून माझ्या पोटात खड्डाच पडला! फोटो काढायचे आणि ते पण ते अगदी टिप्पीकल. बोअरिंग पोज मधले! ! श्याss. . पण आईचं सुरूच होतं की, “तू मुंबईला काढणार की घरी येऊन काढणार? ”

मी थोडा विचार केला आणि म्हणाले. ताईशी बोलून मी ठरवते

पण अजून प्रश्न संपले नव्हते. उलट आता खूप मोठ्ठा प्रश्न सुरू झाला होता आणि तो किती दिवसांनी. . नाही नाही किती महिन्यांनी, वर्षांनी सुटणार होता देवच जाणे

मला माझ्या दोन्ही बहिणींच्या वेळेस जे काही घडलं होतं ते आठवत होतं. तेव्हा खरं तर खुप मजा वाटली होती ते सगळं बघायला. पण म्हणतात ना जावे त्याच्या वंशा तेंव्हा कळे!

आज जेव्हा माझ्यावर ती वेळ येऊ घातलीये तेव्हा अगदी अजून कशात काही नसतांना पण मला भीती वाटत होती. टेन्शन आलं होतं

आई-बाबांनी जसा हा विषय सुरू केला तसं माझ्या बहिणींनीसुध्दा याच विषयावर माझ्याशी बोलायला सुरूवात केली. जवळपास रोज घरचे सगळेजण फक्त या एकाच विषयावर बोलायला लागले. मला तर सुरूवातीलाच कंटाळा येत होता. पण त्या सगळयांमधे जणू एक सळसळता उत्साहच संचारला होता आणि आता माझं लग्न हा एकच ध्यास त्यांनी घेतला होता

बाबांनी एका दिवशी ठरवलेल्या वधु-वरसूचक मंडळाचा फॉर्म आणला. जुजबी माहिती त्यांनी भरली आणि भरता भरता एका ठिकाणी त्यांना स्पीडब्रेकर लागला. “जोडीदारा”बद्दल अपेक्षा. मला लगेच फोन आला की सांग तुला नवरा 'कसा' हवा! !

मला हे ऐकून एक क्षण कळलंच नाही की बाबा काय विचारत आहेत मला? ? मी चक्रावून विचारलं तसं बाबांनी तोच प्रश्न पुन्हा विचारला. पण मला कुठे माहित होतं उत्तर? ! ! मला खरंच माहित नव्हतं की मला कसा नवरा हवाय म्हणून. . माझं डोकं बधिर झालं. काहीच सुचेना

शेवटी मी बाबांना सांगितलं की मला थोडा वेळ द्या. लेट मी टॉक टू मायसेल्फ अबाउट ऑल धीस! ! बाबा हो म्हणाले. ३ महिन्यांचा वेळ मिळाला. हुश्श!



# पूर्वतयारी भाग २

पहिला जवळपास एक महिना ह्या प्रश्नाचं उत्तर शोधण्यात गेला की लग्न का करायचं. काय गरज आहे लग्नाची. सध्या जे लाईफ सुरू आहे त्यात काय वाईट आहे? नोकरी आहे. मित्र-मैत्रिणी आहेत. वीकेन्डचं शेडयूल एकदम सेट आहे. मग त्या नवीन व्यक्तीसाठी जागा कुठे आहे माझ्या दिवसात? मला खरंच गरज आहे का पार्टनरची

ताईशी बोलले. माझ्या लग्न झालेल्या मैत्रिणीशी बोलले त्या सगळयांचं म्हणणं होतं की तुमच्या लाईफमधे तुमचं असं कोणीतरी असणं ही एक खुप वेगळी आणि छान भावना आहे. रोज घरी आल्यावर तुमची वाट बघणारं तुमचं हक्काचं एखादं माणूस असणं खुप गरजेचं आहे. आज जरी सगळया गोष्टी सेट वाटत असल्या तरी कुठेतरी यापलीकडे तुम्हांला वाटतं की... आपलंही घर, फॅमिली असावी. .

पुन्हा काहीही झालं तरी माणूस एकटा नाही राहू शकत. आणि आपल्या समाजामधे मुलगी जर बिनलग्नाची असेल तर तिला तर त्रास देतातच, पण तिच्या आई-वडिलांनासुद्धा काही कमी मनस्ताप देत नाहीत. हे आणि असे सगळया टोकाचे विचार मला ऐकायला मिळत होते. आणि माझा गोंधळ वाढतच होता

हिय्या करून एका दिवशी मी स्वत: समोर बसले आणि प्रश्न विचारायला सुरूवात केली.

प्रश्न: मला भिती कशाची वाटतीये? लग्न ह्या इव्हेन्टची?

उत्तर: नाही.

प्रश्न: मग? लग्न करून नवीन घरात गेल्यावर तिथे येणाऱ्या जबाबदारीची?

उत्तर: नाही.

प्रश्न: बरं मग? रोज ऑफिस सांभाळून घरी स्वयंपाक करावा लागेल ह्याची? (हा प्रश्न विचारात घेणं भाग होतं. कारण मी गेले १० वर्ष घराबाहेर आहे. जिथे जाते तिथे पेईंग गेस्ट म्हणून राहते त्यामुळे स्वयंपाक येत जरी असला तरी प्रॅक्टीस नाहीये ना 😕 )

उत्तर: ह्याss अजिबात नाही!

प्रश्न: मग प्रॉब्लेम आहे कुठे? ? ? ?

उत्तर: बहुतेक मला भीती ही वाटतीये की ज्या व्यक्तीसोबत माझं लग्न ठरेल त्याचा नी माझा स्वभाव जुळेल का? मला जे बरोबर वाटतं ते त्यालाही बरोबर वाटेल का? मी त्याच्या गोष्टी सहज ॲक्सेप्ट करू शकेन का? व्हॉट अबाउट कम्पॅटिबीलीटी?

तर हे होते प्रॉब्लेम्स! !

आतापर्यंत प्रश्नच सापडत नव्हता. आता लकीली सापडला तर मी खनपटीलाच बसले उत्तर शोधण्याच्या 🙂

मग बरीच चर्चासत्रं घडली पुन्हा एकदा घरच्यांशी. मित्र-मैत्रिणींशी आणि कुठेतरी मला थोडंसं उत्तर सापडलं. . . काहीही झालं तरी दोन भिन्न स्वभावाच्या व्यक्ती सोबत आल्यावर थोडं ॲडजेस्ट करावचं लागतं. दोघांनासुद्धा. सो नॉट टू वरी मच. पुढे जायला काही हरकत नाही.

मी स्वत:ला तयार केलं आणि बाबांना फोन करून माझ्या डोक्यात असलेल्या “पार्टनरची” अपेक्षा सांगितली. सगळे एकदम खुश झाले. एक स्पीडब्रेकर ओलांडला.

आता एकच अडचण होती. मुलीचे फोटो! !

आमच्या ताईबाईंनी तो प्रश्नदेखील चुटकीसरशी सोडवला. तिच्या तिथे राहणाऱ्या एका फोटोग्राफरकडे माझ्या “खास” फोटोजसाठी वेळ ठरवली.

आदल्या दिवशी बसून मी आणि ताईने मी कोणते कपडे घालून फोटो काढायचे हे सगळं ठरवलं. दुसऱ्या दिवशी वेळ ठरवली होती ११ वाजताची. पण आमचं सगळं आवरून निघायला आम्हांला चांगलाच उशीर झाला आणि आम्ही तिथे पोहोचलो दुपारी ३ वाजता!

पहिला फोटो साडीवर काढायचा म्हणून मी घरूनच तयार होऊन गेले होते. . आधीच उशीर झाला होता त्यामुळे गेल्या गेल्या फोटोग्राफरने मला "पोज" द्यायला सांगितली.

आजपर्यंत माझे स्वत:चे चिक्कार फोटो काढले गेलेले आहेत. या ना त्या कारणामुळे. अगदी साडीमधे सुद्धा. पण आज जेव्हा त्याने "पोज" द्यायला सांगितली, तेव्हा मला इतकं हसू फुटलं की मला धड उभंदेखील राहता येईना. मला बघून ताईदेखील हसायला लागली. मी कसंबसं स्वत:ला शांत केलं आणि उभी राहिले. फोटोग्राफर म्हणाला "स्माईल" आणि मी पुन्हा एकदा जोरजोरात हसायला लागले. तसा तो म्हणतो, "अहो. इतकी जास्त नकोय. थोडं नाजूक हसा ना. स्मितहास्य माहितीये ना?" त्याचा वैतागलेला आवाज आणि माझ्या ताईचे मोठे झालेले डोळे बघून मी कसंतरी ते स्मितहास्य दिलं आणि साडीतले फोटो झाले एकदाचे!

त्यानंतरच्या फोटोसाठी मी तयार होऊन बाहेर आले तर स्टुडीओमधे अचानक गर्दी दिसली. पासपोर्टसाठी फोटो काढायला येणाऱ्यांची! २, ४ लोकांचे फोटो काढून झाल्यावर मधेच माझा नंबर लागला. पुन्हा एकदा मी शहाण्या मुलीसारखी स्मितहास्य देण्याच्या तयारीत असतांना समोर सगळी गर्दी माझ्याकडेच बघतीये हे बघून मात्र मला मेल्याहून मेल्यासारखं झालं. पण काय करणार? पर्याय नव्हता. घामाघूम होऊन फ़ुल टेन्शनमध्ये कसंबसं फोटोशूट आवरलं आणि आम्ही बाहेर पडलो.

ठरलेल्या दिवशी फोटो मिळाले. ते बघून माझ्या घरच्यांच्या चेहऱ्यावर अगदी पूर्ण समाधान दिसलं. लगेच बाबांनी एक फोटो सिलेक्ट केला आणि वधु-वरसूचक मंडळाच्या फॉर्मसोबत तो पाठवून दिला! ! !

# ‘नवरा” एक खोज - भाग १

वधू-वरसूचक मंडळाच्या टेबलवर माझा फॉर्म जाऊन पोहचायच्या आत आमच्या नातेवाईकांमधे ही ब्रेकिंग न्युज अगदी वणव्यासारखी पसरली. दोघी बहिणींच्या सासरकडची मंडळी देखील ह्या कार्यात हातभार लावण्यासाठी सरसावली आणि जवळपास सगळयाच दिशांमधून विविध “योग्य” वरांची माहिती माझ्या आई-बाबा, तायांना फोन अथवा प्रत्यक्ष भेटीतून मिळू लागली.

मला तर इतकं आश्चर्य वाटलं. विचार आला. अचानक सगळ्या मुलींची लग्न झाली की काय. म्हणजे फक्त मी एकटीच राहिलीये म्हणून सगळ्यांनी इतका प्रचंड प्रतिसाद दिला. साद न घालताही

असो. तर माझे बाबा लगेच कामाला लागले. तसा तर बाबांना व्यवस्थित अनुभव होता ह्या गोष्टींचा, माझ्या मोठया बहिणींच्या लग्नामुळे. मग बाबांनी माझ्यासाठी येणाऱ्या स्थळांची माहिती व्यवस्थितपणे एका फाईल मधे ठेवायला सुरूवात केली. एक-एक प्रोफाईल वाचून त्याची पत्रिका जुळते की नाही, किती गुण जुळतात हे सगळं बघून बाबा ठरवत होते की कोणत्या स्थळाला संपर्क करायचा. असं करत करत बाबांनी नातेवाईकांकडून आलेल्या सगळया प्रोफाईल्सची विभागणी केली आणि योग्य ती कारवाई केली.

मी महिन्या-दोन महिन्यातून घरी चक्कर मारते तशी मी त्याही वेळी वीकेन्डला घरी गेले होते. घरी पोहोचल्यावर माझ्या भावाने सांगितलं की तुझ्यासाठी ह्यावेळेस एक सरप्राईज आहे. मला काही कळालं नाही आणि मी जास्त लक्ष पण दिलं नाही.

रविवारी सकाळी निवांत उठायचा विचार होता. पण आईने लवकर उठायला लावलं. मी जरा वैतागतच उठले! भाऊ पुन्हा समोर आला आणि म्हणाला. “सरप्राईजsss आज तुला बघायला येणार आहेत! ! हीहीहीही ”. मी पलंगावर ताडकन उठूनच बसले. हे कसलं

सरप्राईज! ! मला इतका राग आला. सरळ स्वयंपाकघरात जाऊन मी आईला जरा चिडूनच विचारलं. “हा काय प्रकार आहे? ? ”

तसं आई अगदी शांतपणे म्हणाली. “अगं, काही नाही. आपल्या ओळखीतल्या एकाने ह्या मुलाबद्दल सांगितलं. तर त्याचे आई-वडील आज तुला भेटायला येणार आहेत. एवढंच! ”

मी. “अरे. पण मला तुम्ही सांगितलं का नाही? ? आणि मुलगा करतो काय? त्याचा फोटो कुठे आहे? ? ”

आई. “अगं. आज त्याचे आई-वडील फोटो घेऊन येणार आहेत. मुलगा इथे नसतो म्हणून”.

श्याss काय बोअर आहे. रविवारच्या सकाळचा पार मूडच गेला माझा. म्हणजे मला त्या मुलाच्या आई-वडीलांना भेटण्यात काही प्रॉब्लेम आहे असं नव्हतं पण असं अचानक “पहिल्या” कांदा-पोहे कार्यक्रमाला मला सामोरं जावं लागेल असं कधी वाटलं नव्हतं

नंतर बाबा म्हणाले. “तू साडी नेस आज”.

मी - “बाबा! साडी काय हो! मी नाही नेसणार! ”

आई - “बरं बाई. एखादा चांगला पंजाबी सूट घाल. ठिक आहे. ”

मी - “नाही गं आई. प्लीज ना. तसंही तो मुलगा येत नाहीये. मग मी कुर्ती आणि जीन्स घालते”.

लकीली आई रेडी झाली आणि बाबा पण काही म्हणाले नाही

ते लोक ४ वाजता येणार होते म्हणून आम्ही सगळी आवरा-सावर करून ठेवली आणि तयार होऊन बसलो. आईने मला आतमधेच थांबायला सांगितलं होतं आणि आईच चहा आणि खायचं देणार होती. मला खुप बरं वाटलं की माझा पहिलाच प्रसंग अगदी टीपीकल “कांदा-पोहे” नसणार आहे

ते लोक ठरलेल्या वेळेनुसार घरी आले. बाबांनी त्यांना बसवलं. ओळख वगैरे झाली. आईने पाणी नेऊन दिलं आणि मला बाहेर येण्याची खुण केली. मी बाहेर येऊन एका खुर्चीत बसले मग बाबांनी माझी ओळख करून दिली. मग त्यांनी मला एक-एक प्रश्न विचारायला सुरूवात केली.

प्रश्न क्र. १ : शाळा कुठली?

मी थोडी गोंधळले. पण उत्तर दिलं.

प्रश्न क्र. २ : मराठी.  इंग्लीश की सेमी-इंग्लीश मिडीयम?

मला थोडं हसू आलं (मनातल्या मनात). मी उत्तर दिलं.

प्रश्न क्र. ३ : १० वी ला किती मार्क मिळाले होते?

प्रश्न क्र. ४ : १२ वी कुठे केलं?

प्रश्न क्र. ५ : सायन्स होतं का?

प्रश्न क्र. ६ : आयट्रिपलई ची परिक्षा दिली होती का?  आयआयटी साठी प्रयत्न केला होता का?

प्रश्न क्र. ७ : १२ वी ला बोर्डात नंबर वगैरे आला होता का?

प्रश्न क्र. ८ : इंजिनीयरींग ला नंबर लागला नाही का?

प्रश्न. . . . . . .

प्रश्न. . . . . . . . . . . . .

प्रश्न. . . . . . . . . . . . . . . . .

आईग्ग! !  मी तर ह्या सगळ्या प्रश्नांची उत्तरं देत देत अगदी घामाघूम झाले!  माझ्या कॅम्पस इंटरव्ह्यूमधे पण इतके प्रश्न नव्हते विचारले गेले माझ्या शिक्षणाबद्दल

जेंव्हा प्रश्नांची ही सरबत्ती संपली त्यानंतर त्या मुलाच्या वडिलांनी स्वत:च्या मुलाबाबत सांगायला सुरूवात केली. .

आमचा मुलगा अमुक शाळेत संपूर्ण इंग्लीश मिडीयम मधे शिकला आणि १० वी बोर्डात तमुक क्रमांकाने चमकला!

पुढे १२ वी ला तो ह्या कॉलेजात गेला. त्याने आयट्रिपलई आणि आयआयटी या परिक्षांची तयारी देखील केली आणि तो १२ वीला बोर्डात अमुक क्रमांकाने झळकला! !

त्याने कॉम्प्युटर इंजिनीयरींग केलं एका प्रसिद्ध कॉलेजमधून आणि आता एका “आयटी” फेमस शहरात दणकट पगाराची नोकरी करतो! ! !

एका दमात त्यांनी ही माहिती पुरवली! !

मी. आई. बाबा सगळे त्यांच्याकडे बघतच बसलो. मला तर कळतच नव्हतं काय प्रकार सुरू आहे. म्हणजे कांदा-पोहे कार्यक्रमात असंच होत असतं की हे काहितरी वेगळं घडत होतं. नो आइडिया याssर माझी तर पहिलीच वेळ होती

नंतर मग त्यांनी हळूच त्यांच्या मुलाचा फोटो काढला आणि बायकोच्या हातात दिला. त्यांनी तो अगदी कौतुकाने डोळे भरून बघितला आणि माझ्या आईच्या हातात दिला. आईने जस्ट बघितला आणि लगेच मला दिला.

मी तो फोटो बघताना विचार करत होते की ह्या मुलाचा मेंदू किती मजल्यांचा आहे? म्हणजे त्याच्या वडिलांनी इतकं वर्णन केलं त्याच्या बुध्दिमत्तेचं की मी त्याचा चेहरा बघायचं सोडून असं काहीतरी शोधायचा प्रयत्न केला बाकी फोटो ठीक होता.

पुढे पाच-एक मिनिटे औपचारिक बोलणं झालं आणि नमस्कार-चमत्कार करून ते जोडपं निघून गेलं. ते दिसेनासे होईपर्यंत मी आणि आईने कसाबसा धीर धरला आणि नंतर जे हसत सुटलो. ओ गॉड ! ! !

बाबा शेवटी रागावले आम्हाला. खरंतर त्यांना पण हसू येत होतं घडलेल्या प्रकाराबाबत पण ते योग्य वाटत नाही ना; मग आम्ही थोडया शांत झालो.

घडलेला प्रकार काय होता ह्याबद्दल जरा चर्चा केली आणि शेवटी ठरलं की. प्रत्यक्ष मुलगा भेटणार असेल तरंच इथून पुढे कोणत्याही प्रोफाईलला होकार दयायचा. आणि हो! त्याच्या अपेक्षांमधे कुठे मुलीचा बुध्यांक किती हवा हे दिलंय का हे पण बघायचं म्हणजे आजचा प्रकार पुन्हा घडायला नको

आणि अजून! मी घरच्यांना बजावलं की. “नो मोअर सरप्राइजेस प्लीज ”

# “नवरा” एक खोज - भाग २

काही दिवसातच वधू-वरसूचक मंडळाकडून स्थळांची यादी आली ती बाबांनी नीट वर्गवारी करून काही मुलांच्या पालकांना संपर्क केला. त्यातल्या अर्ध्या लोकांनी उत्तरच दिलं नाही. १/४ लोकांनी फालतू काहीतरी प्रतिउत्तर दिलं. उरलेले होते त्यातले काही माझ्या आई-बाबांना आणि तायांना पटले नाही म्हणून तितके वगळले. आणि शेवटी उरले फक्त दोनच त्यातला मला एकच ठीक वाटला

मी एकाला भेटायला तयार आहे म्हटलं आणि पुन्हा एकदा आमच्या घरवाल्यांमधे उत्साहाचं वारं संचारलं. लगेच मग त्या मुलाच्या घरी बोलून वगैरे तारीख ठरली माझ्या पहिल्या-वहिल्या कांदे-पोहे कार्यक्रमाची. मी पण एकदम खुश झाले. माझा पहिला कांदे-पोहे कार्यक्रम. काय भूषणावह गोष्ट आहे ना

असो. तर भेटण्याचा दिवस ठरला. मी, आई-बाबा आणि जिजू असे चौघेजण त्यांच्या घरी जायला निघालो. माझ्या बहिणीने मला अगदी सिनेमातल्या नटीसारखं रंगवलं होतं.

गाडीमधे कोणी जास्त काही बोलत नव्हतं. मी पण विचार करत होते की मी काय बोलणार होते त्या मुलाशी? त्याच्या कामाविषयी की आवडी-निवडीबद्दल की अजून काही? श्या. . नुसते प्रश्नच येत होते डोक्यात. म्हणजे प्रश्न काय विचारायचे याबद्दलचे प्रश्न. काही म्हटल्या काही ठरत नव्हतं.

मी विचारात असतानाच आम्ही त्यांच्या घराजवळ पोहोचलो. गाडीतून उतरतांना मला अचानक पोटात खड्डा पडला असं वाटलं. मग मी ड्रेस नीट करण्याच्या बहाण्याने पोटात खरंच खड्डा बिड्डा नाही ना हे चेक केलं. कपाळावरही घामाचे दोन थेंब जाणवले. ते रुमालाने टिपले. मला टेन्शन आलं होतं. मी सगळयांच्या मागे चालत होते. दारातून आत जातांना मला शेजारी प्राजक्ताचं फुल दिसलं आणि एकदम प्रसन्न वाटलं. मग मी बिनधास्त आत गेले.

दारात त्या मुलाचे वडील उभे होते. आत गेल्यावर हॉलमधे बाकी सगळी मंडळी बसलेली होती. बसायची व्यवस्था थोडी विचित्र वाटली मला पण त्यामुळे मला कळेना कुठे बसावं. त्या मुलासमोर बसावं की माझ्या बाबांजवळ! शेवटी मी सरळ त्या मुलासमोरच जाऊन बसले. विचार आला. वेगळं जाऊन बोलण्यापेक्षा असं समोरासमोरच विचारावं.

मग नमस्कार-चमत्कार झाले. दोन्ही कुटुंबांची ओळख झाली आणि मग त्या मुलाच्या वडिलांनी माझ्याकडे बघून पहिला प्रश्न विचारला.

काका : मुंबईमधे कुठे राहतेस?

मी : . . . .

काका : ऑफिसला कशी लोकल ने जातेस का?

मी : . . . .

काका : तुझं शिक्षण काय झालंय? ( हा प्रश्न ऐकला आणि एकदम मला याआधी जे घडलं होतं ती प्रश्नावली समोर दिसली पण पुढचा प्रश्न वेगळा होता )

काका : तिकडे कोणाकडे राहतेस?

मी शेवटच्या प्रश्नाचं उत्तर देईपर्यंत तो मुलगा मला प्रश्न विचारायला लागला. तू कोणत्या टेक्नॉलॉजी मधे काम करतेस?

त्याचा प्रश्न संपत नाही की लगेच त्याची आई म्हणाली. तुम्हाला दोघांना बोलायला वेगळा वेळ दिला जाणार आहे. आता मोठयांना बोलून घेऊ देत. थांब जरा

बापरे! मी तर घाबरलेच त्या काकूंचं ते वाक्य ऐकून. मला कल्पना आली की आता या आपल्यावर बॉम्ब टाकणार आणि खरंच तसंच सुरू झालं.

काकू : जेवणाचं काय काय करतेस?

मी: ऑफीस मधे जेवते दुपारचं आणि संध्याकाळी जिथे राहते त्या काकूंकडे. . .

त्या म्हणाल्या : अगं मला विचारायचंय जेवणातलं काय काय बनवतेस? ?

श्या. . मी जीभ चावली आणि म्हणाले की. . .  करता तर येतं सगळं. पण सध्या प्रॅक्टीस कमी झाली आहे.  कारण पीजीच्या काकू गॅस वापरु देत नाहीत. .

त्यांच्या कपाळावर उठलेली अठी मला व्यवस्थित दिसली. पण मी जास्त विचार नाही केला कारण पुढचा प्रश्न कान देऊन ऐकायचा होता ना 😉

काकू : ऑफीस मधून घरी किती वाजता येतेस?

काकू : ऑफीस किती दिवस असतं?

काकू : शनिवार.  रविवार काय करतेस?

काकू : मुंबईहून आई-बाबाना भेटायला किती वेळा घरी जातेस? ? ?  (मी मनातल्या मनात डोक्यावर हात मारला.  हे असले प्रश्न कोणी कांदे-पोहे कार्यक्रमात विचारतात का हो? ? .  काय माहीत बाबा,  विचारतही असतील.  माझा तर पहिलाच म्हणजे तसा दुसरा प्रसंग होता ना)

मी काय बापडी उत्तरं देत होते निमूटपणे. . .

पुढे त्यांनी विचारलं. नेहमी पंजाबी ड्रेसच वापरतेस की साडीपण नेसतेस. . .  मला हसावं की रडावं कळत नव्हतं. . मी सांगून टाकलं. मी नेहमीच जीन्स घालते. कधीतरी पंजाबी ड्रेस आणि साडी शेवटची कधी घातली ते आठवत नाही.

आता पुढचा प्रश्न सुईमधे दोरा ओवता येतो का?  शिवणकाम,  भरतकाम येतं का यापैकी एक असणार अशी माझी खात्री झाली होती पण आश्चर्य म्हणजे त्यांनी माझं उत्तर ऐकल्यावर पुढे काही विचारलंच नाही 😋

हूश्श. . सुटले!

पुढच्याच क्षणी त्या काकू त्यांच्या मुलाला म्हणाल्या की तुम्ही दोघे समोरच्या खोलीत जाऊन बोला. .

मी त्या मुलाच्या मागे खोलीत गेले आणि आम्ही बसलो. .

मला वाटलं तो पहिले बोलेल आणि त्याला वाटलं मी. पण कोणीच बोलेना. . मी विचार केला तो मुलगा आहे तर त्याने सुरूवात करावी आणि त्याने काय विचार केला की. . . ओय! त्याने काय विचार केला मला कसं माहीत असणार? . .

विचित्र शांततेत एखादं मिनिट गेल्यावर मीच विचारलं त्याला तू यू. एस. मधे कुठे राहतोस?

. . त्याचं उत्तर

मी: कुठे राहतोस?

तो: . . त्याने खाली कुठेतरी बघत उत्तर दिलं

मी: कोणत्या टेक्नॉलॉजी मधे काम करतोस?

तो: . . पुन्हा खाली बघूनच त्याने उत्तर दिलं. .

मी: तुझ्या आवडी-निवडी काय आहेत? वीकएंड ला काय करतोस?

. . तो खाली बघूनच बोलत होता म्हणून मी तिकडे वळून बघितलं की तिथे आहे तरी काय. पण काहीच नव्हतं. मला वाटलं मी खूप विचित्र दिसतीये म्हणून तो मला बघायचं टाळतोय की काय. मला काही कळेना 😕

पण तो बोलत होता. मला ना माझं काम खूप आवडतं. मी दिवस-रात्र काम करू शकतो. अगदी मला खाण्या-पिण्याचीसुध्दा शुद्ध राहत नाही. नवीन टेक्नॉलॉजीज. नवीन ॲप्लिकेशन्स. नवीन क्लाइंट्स. नवीन प्रॉजेक्ट्स. सगळं कित्ती एक्साइटिंग असतं ना! आणि कधी जर प्रॉब्लेम आला तर मला अगदी आनंद होतो की चला आता काहीतरी डोकं लावायला मिळेल.

मी कधीच थकत नाही काम करतांना उलट मला असे चॅलेंजेस आल्यावर एनर्जी मिळते आणि मी वीकएंड्सला घरून काम करतो कारण तिथे बाहेर फिरायला जायचं तर सगळं प्लॅनिंग वगैरे करावं लागतं ज्यासाठी मला वेळ नसतो.

पण हो मी एकदा बाहेर गेलेलो माझ्या ऑफीसच्या लोकांसोबत. पण मला बोर झालं तिथे. ते लोक खेळत होते. पण मला काही इच्छा नाही झाली. माझा उगाच वेळ वाया गेला. म्हणून मग मी पुन्हा कधी गेलो नाही त्यांच्यासोबत!

तो एका दमात हे सगळं बोलला. मी तर त्याच्याकडे अवाक् होऊन बघतच राहीले.

.

मी ह्यापुढे काय बोलणार होते. . . त्याचं कामाबद्दलचं प्रेम ऐकून माझा चांगलाच मूड ऑफ झाला!

मग त्याने प्रश्न विचारला मला. तू किती तास काम करतेस?

आता मलाही त्याच्याकडे बघून बोलायची अजिबात इच्छाच नव्हती. पण त्याने काहीतरी विचारलं म्हणून मी सांगितलं की मी फक्त जितके तास आवश्यक आहे तितकंच काम करते!

तो : कोणत्या टेक्नॉलॉजी मधे काम करतेस तू?

मी : . . . . उदास सुरात उत्तर.

तो : तू किती लोकांची टीम हॅंडल करतेस?

मी : . . . .

ह्यापुढचा प्रश्न येणार तेवढ्यात काकूंचा आवाज आला म्हणून मी वर बघितलं तर त्या म्हणाल्या. ' आता पुरे तुमच्या गप्पा. थोडं खाऊन घ्या'. असं म्हणत त्यांनी फराळाचं ताट आमच्यासमोर धरलं. कांदे-पोहे सोडून बाकी सगळं काही होतं त्यात. चिवडा-फरसाण पासून ते पार गुलाब-जामून पर्यंत मी ते बघितलं आणि फक्त एक छोटी खोबऱ्याची वडी उचलली. लगेच त्या म्हणाल्या की. अगं घे ना. काही जाड नाही होणार तू हे खाल्लंस तर!

मला त्यावेळी माझा राग कंट्रोल करून स्मितहास्य करावं लागलं. जे अतिशय अवघड काम होतं! !

नंतर आम्ही पुन्हा आत जाऊन बसलो. मी आईकडे बघून माझी रिॲक्शन सांगितली आणि तिचा पण चेहरा पडला. त्यानंतर त्या काकूंनी त्यांचा बंगला आम्हाला दाखवला. आणि त्यांच्या श्रीमंतीचं कौतुक ऐकत ऐकत आम्ही एकदाचे त्या घरातून बाहेर पडलो. गाडीमधे बसल्या बसल्या मी माझी नाराजी आणि निर्णय व्यवस्थितपणे मांडला आणि अशा तऱ्हेने माझा पहिला-वहिला कांदे-पोहे कार्यक्रम पार पडला 😑



# “नवरा” एक खोज - भाग ३

घरी आल्यावर घडलेल्या प्रसंगाची चर्चा सुरू झाली. आता त्यात ताईपण सामील झाली होती. बाबा आणि जिजू म्हणत होते की घरचं सगळं चांगलं आहे. मुलगा पण व्यवस्थित आहे तर मग काय हरकत आहे?

मी म्हटलं, “जर तो माणूस २४ तास फक्त कामाबद्दल विचार करत असेल तर मला नाही ते पटत. माणसाला स्वत:चं पण काहीतरी लाइफ हवं. काहीतरी विरंगुळा हवा. दोन मित्र-मैत्रिणी हवेत. कामासाठी आपण आहोत की आपल्या गरजेसाठी काम आहे? पु. लं. म्हणतात त्याप्रमाणे पोटापाण्याचा उद्योग तुम्हाला जगवेल. पण कलेशी जमलेली मैत्री तुम्हाला का जगायचं हे सांगून जाईल. माझं मत हे आहे की मी अतिकाम करणाऱ्या सोबत नाही अॅब्जेस्ट करू शकणार.”... हे सांगताना त्याचं जमिनीकडे बघून बोलणंही मला आठवत होतं.

आई म्हणाली, “अगं आत्ता तो एकटा आहे त्यामुळे इतकं काम करत असेल. उद्या लग्न झालं की मग घालेल हळू हळू लक्ष सगळ्या गोष्टींमधे. ”

ताई पुढे आली न म्हणाली की लग्नानंतर कोणतीही व्यक्ती पूर्णत: बदलू नाही शकत. जर आज त्याला दिवसाचे २० तास काम करायची सवय आहे तर पुढे जाऊन फार तर तो एखादा तास कमी काम करेल. पण पूर्णपणे तो बदलेल ही अपेक्षा चुकीची आहे. तसंच (मला) इच्छेविरुद्ध निर्णय घ्यायला लावणं पण चुकीचं आहे. . ताईचं म्हणणं सगळ्यांना पटलं आणि माझ्या निर्णयाला मान्यता मिळाली 😁

त्यानंतर काही दिवस शांततेत गेले मग पुन्हा वधु-वर मंडळाचा नवीन अंक आला की वाचन सुरू. त्यातून पुन्हा काही मुलांची यादी निघाली. त्यांना संपर्क केला आणि अपेक्षेप्रमाणे त्यातल्या अर्ध्या लोकांनीच उत्तर पाठवलं. मग ऑफीस मधून आल्यावर रोज़

मी एक एक मुलाची माहिती वाचून ठरवत होते काय करायचं ते. सुदैवाने म्हणा की दुर्दैवाने म्हणा मला त्यातला एकही मुलगा पटला नाही. . एखाद्याचं वय खूप जास्त वाटत होतं तर कोणाचं शिक्षण कमी. . कोणी चेहर्‍यावरून आणि दिलेल्या माहितीवरून अती-गंभीर तर कोणी प्रकृतीने अती सुदृढ!

मी एका गोष्टीने मात्र थक्क झाले की. ह्या सगळ्या प्रोफाइल्स मधे एक गोष्ट समान होती. एकाही मुलाचा फोटो लग्नासाठी स्थळ म्हणून पाठवण्यालायक नव्हता.

म्हणजे कोणी बोटीवर बसून समुद्राकडे बघतांनाचा फोटो पाठवला होता तर कोणी एका अगडबंब घंटेसोबत(! ) उभं राहून फोटो काढला होता. .

कोणी झाडाखाली उभा राहून सावलीमधे काढलेला फोटो ज्यामधे त्या मुलाच्या चेहर्‍यावर अंधार आहे असा फोटो दिलेला तर एकाने कॉलेजच्या आयडी-कार्डवरचा फोटो विथ शिक्का टाकलेला होता

कोणी घरच्या अंगणात उभा राहून मळकट्ट-कळकट्ट जीन्स आणि टी-शर्ट विथ स्लिपर्स घालून फोटो काढून पाठवला होता तर कोणी पिकनिकला घोड्यावर बसून काढलेला फोटो दिला होता

सगळ्यात चमत्कारिक गोष्ट ही होती की एका मुलाने एका बोटीमधे बसून (पूर्वीच्या काळी जत्रेत काही वस्तू ठेऊन त्यासोबत फोटो काढायची पद्धत होती ना तसा) फोटो काढला होता. तो बघून तर हसावं की रडावं हे कळेना आम्हांला. आम्ही त्याला दुसरा फोटो पाठव म्हणून सांगितलं तर त्याने आधी पाठवलेल्या फोटोला क्रॉप केलं आणि फक्त चेहरा दिसेल इतकाच फोटो पाठवला

हे सगळे फोटो बघितल्यावर माझी खूप चिडचिड झाली. मुलीचे फोटो या लोकांना कसे लागतात तर साडीमधे, फुल्ल मेकअप करून. अगदी स्टुडिओमधे पाच एक हजार वाया घालवून काढलेले. आणि मुलांचे फोटो बघा. साधं फेसबूकच्या प्रोफाइलला फोटो टाकायचा झाला तर हे लोक काय काय करून अगदी चांगल्यातला चांगला फोटो टाकतात आणि लग्नासाठी प्रोफाइल पाठवायचं म्हटलं तर असले फोटो

जर मुलीने तिचे जीन्स मधले, नदीकाठचे किंवा पिकनिकला काढलेले फोटो पाठवले असते तर बघणाऱ्यांनी तिच्या आई-वडिलांचा लगेच उद्धार केला असता आणि फोटो बघूनच नकार कळवला असता.

साधा विचार पण करता येत नाही का या मूलांना आपण काय करतोय याचा की फक्त मुलाकडची बाजू म्हणून सगळं क्षम्य असतं!

निदान मला तरी नाही पटत. जर मुलीकडून काही अपेक्षा असतील तर मुलाकडून पण तितक्याच अपेक्षा असतात!

माझे हे सगळे विचार ऐकून माझ्या आई-बाबांना आणखीनच टेन्शन आलं पण माझी अपेक्षा काही अवाजवी नाहीये. निदान फोटो तरी चांगला पाठवावा ना मुलाने. मग पुढचा विचार करू शकतो आपण

हूह. . . या महिन्याची यादी अशीच निकालात निघाली. . . आता पुन्हा पुढचा अंक येईपर्यंत डोक्याला शांतता



## 'नवरा' एक खोज - भाग ४

दरम्यानच्या काळात आई-बाबा मोठ्या बहिणीकडे काही दिवसांसाठी हवापालटाकरता गेले होते आणि त्याच वेळेला माझी माहिती अंकामध्ये येणार होती. आमच्या हातात पुस्तक पडायच्या आधीच पुन्हा एकदा प्रोफाइल्सचा पाऊस पडला.

बाबांनी ह्यावेळेला प्रथम येणाऱ्यास प्रथम संधी असा नियम लावून एका मुलाचं प्रोफाइल मला बघायला सांगितलं. खूप दिवसानंतर इतका व्यवस्थित फोटो असलेलं हे प्रोफाइल मला सगळ्या अर्थाने चांगलं वाटलं.

पण एक अडचण होती की आई-बाबा घरी नाहीत.  तर मग कांदे-पोहे कार्यक्रम करायचा कसा? कोणीतरी मोठं माणूस हवं ना. ह्यावर लगेच माझ्या मामाश्रींनी तोडगा काढला.  तो आणि माझी मावशी ह्यांनी विडा उचलला आणि कार्यक्रम सुरळीत पार पाडण्याची हमी आई-बाबांना दिली

आमच्याकडची सगळी व्यवस्था लावल्यावर बाबांनी मुलाकडच्यांना कळवलं. तारीख ठरली.

मावशी आणि मामा सकाळीच घरी आले. सगळं घर आम्ही व्यवस्थित लावून ठेवलं होतंच आईने सांगितल्याप्रमाणे.

मावशीने आल्यावर फ्रिज बघितला आणि म्हणाली अगं कांदे-पोहे करायचे तर मिरची,  कोथिंबीर, कांदा काहीच नाही.  असं कसं?

मी म्हणाले. "अगं ते लोक लग्नाचं जेवण करून येणार आहेत तर आपण फराळाचं देऊ ना त्यांना,  पोहे कशाला करायचे? "

ती म्हणाली. “असं कसं? ते लोक काय म्हणतील आपल्याला? हे नाही चालणार. . तू आत्ता लगेच जा आणि सगळं सामान घेऊन ये! ”

मी काय करणार. अडला हरी. . . मग गेले बाहेर आणि घेऊन आले सगळं

मावशीने पोहे, चहा करण्याची पूर्वतयारी करून ठेवली. मग मामा मला म्हणाला की तू काय साडी नेसणार आहेस का? मी तर एकदम उडालेच. मी म्हटलं “नाही रे. मी साधा पंजाबी ड्रेस घालणार आहे. बाबा म्हणाले चालेल म्हणून.” मग दोघेपण काही बोलले नाही. मनात म्हटलं. बरं झालं ऐनवेळी बाबांचं नाव सुचलं नाहीतर दोघांनी गळ घालून मला साडी नेसायलाच लावली असती!

आम्ही सगळे तयार होऊन त्यांची वाट बघत बसलो. ते अगदी वेळेत घरी पोहोचले.

मावशीने मला आतमधेच थांबायची ताकीद दिली होती. म्हणाली ते लोक आल्यावर मी पाणी नेऊन देणार मग तू पोहे घेऊन ये. मुलीने आधीच बाहेर येऊन बसायचं नसतं. . मी काय बोलणार. माझी तर अडकित्यातली सुपारी झाली होती. त्यामुळे थांबले आतच

ठरल्याप्रमाणे मावशीने मला पोहे ठेवलेल्या ताटल्यांचा ट्रे घेऊन बाहेर यायला सांगितला. मी बाहेर पाऊल ठेवलं आणि मामाने माझं एकदम भरभरून कौतुक करतच ओळख करून दिली. मी एकेकाला पोहे देत होते. त्यामुळे मला मुलाला पण व्यवस्थित बघता आलं. नंतर मी जागेवर बसले.

अतिशयोक्ती वाटेल. पण पोहे दिल्यावर सगळी मंडळी फक्त खात होती १० मिनीटे. कोणीच बोललं नाही! मी, मामा, मावशी आणि माझा भाऊ एकमेकांकडे बघून नजरेनेच विचारत होतो काय प्रकार आहे हा? तितक्यात एका काकांची प्लेट रिकामी झाली. तसं माझ्या मावशीने अजून एकदा पोहे दिले. तरीही तीच अवस्था

एकदाचे झाले सगळयांचे पोहे खाऊन आणि त्यांनी प्लेट्स खाली ठेवल्या मग त्या मुलाचे वडील बोलले. त्यांनी सगळया कुटुंबाची ओळख करून दिली. प्रथम त्यानी स्वत:ची ओळख करून दिली, पीएचडी इन <विषय>. मुलाची आई एम. ए. . मग

मुलगा पीएचडी इन <विषय>. मग त्याचे सख्खे काका पीएचडी इन <विषय>. काकू अन त्यांची एक छोटी मुलगी.

फक्त शेवटी ज्या दोघींची ओळख करून दिली त्याच पीएचडी नव्हत्या.

त्याचे वडील सांगत होते की माझी मोठी मुलगी पण पीएचडीच आहे आणि जावई सुद्धा.

माझ्या मुलीने पीएचडी केल्यावर तिचं लगेच लग्नं झालं. आणि तिला लग्नानंतर एका ठिकाणहून नोकरीचा कॉल आला. त्यामुळे मुलीसाठी आमचे जावईबापू तिच्या नोकरीच्या गावी शिफ्ट झाले. फारच चांगली मंडळी आहेत तिच्या सासरकडची.

अचानक माझ्याकडे बघून त्यांनी प्रश्न विचारला, “तू कधी करणारेस पीएचडी? ”

मी एक क्षण विचार केला आणि सांगितलं की. “माझं अजून काही तसं ठरलं नाहीये. आधी लग्नाचं पार पडू देत मग मी विचार करेन. दोन्ही गोष्टी एकत्र आल्यातर सगळाच गोंधळ होईल. म्हणून एक-एक करणार. ”(माझं उत्तर त्यांना पटलं असावं असं मला वाटलं. )

मग त्या मुलाच्या आईने माझ्याकडे मोर्चा वळवला आणि पुन्हा एकदा कुठे राहतेस पासून जी प्रश्नावली सुरू झाली ती पार स्वयंपाकातलं काय येतं ह्या प्रश्नावरच थांबली! मला आता प्रश्नपत्रिका पाठ झाली होती. मॅच फ़िक्सिंगच एक प्रकारचं. मी अगदी सराईतासारखी उत्तरं दिली त्या सगळया प्रश्नांना आणि पुढच्या मा़ऱ्यासाठी सज्ज झाले. आता होती मुलाची पाळी. त्याने सुरू केलं.

तो : कोणत्या कंपनी मधे काम करतेस?

मी : . . . .

(लकिली हा मुलगा माझ्याकडेच बघून बोलत होता 🙂 )

तो : ऑफीस मधून कुठे बाहेरच्या देशात जाण्याची संधी मिळेल का?

(तो मुलगा यू. एस. ला राहत होता म्हणून कदाचित हा प्रश्न विचारला असेल)

मी : . . . . .

तो :लग्नानंतर एक्झॅक्टली तू कधी पीएचडी करशील?

मी :अजून लग्न ठरलं नाहीये त्यामुळे मी अजून तरी लग्नानंतर काय न कधी करेन याचा विचार केलेला नाही. त्यामुळे नक्की तारीख नाही सांगता येणार.

अचानक त्याचे वडील म्हणाले की. आमचा मुलगा प्लॅनिंग करूनच सगळ्या गोष्टी करतो. तो फ़ारच वक्तशीर आहे. त्याचं दिवसाचं सगळं शेडयुल ठरलेलं असतं किती वाजता काय करायचं ते. मला वाटतं प्रत्येकाने असंच असायला हवं म्हणजे आपलं आयुष्य आपल्या हातात राहतं.

हे ऐकून मला एकदम तो दिल चाहता है मधला, सोनाली कुलकर्णीचा बॉयफ्रेंड आठवला. त्याला पण असंच घडयाळानुसार चालायची सवय असते 😉 (आय होप ही इझ नॉट लाइक दॅट)

तो: लग्नानंतर तुला कुठे राहायला आवडेल?

मे:(हा प्रश्न मला पहिल्यांदाच विचारला गेला 🙂 )माझं असं काही नाहीये. मी आय. टी. मधे आहे त्यामुळे जिथे जॉब असेल त्या शहरात मी राहायला तयार आहे.

त्याची आई. बाबा दोघे एकदमच: “तू लग्नानंतर जॉब करणारेस? ? ”

मी काही बोलणार त्या आधीच माझा मामा: “हो. आमची मुलगी लग्नानंतर घरी नाही बसून राहू शकत. ती जॉब करणार. हल्लीच्या मुली खूप स्मार्ट आहेत हो. नोकरी, घर सगळं सांभाळतात. ”

त्याचे बाबा: “अहो पण हल्ली बऱ्याच कंपन्या घरून पण काम करू देतात. म्हणजे काय आहे की कामाचं काम करून होतं आणि घरामधे वेळ पण देता येतो. काय रे! ” (हे मुलाला उद्देशून)

मग तो मुलगा म्हणाला “हो ना! मागच्याच महिन्यात माझ्या मित्राच्या बायकोने असाच एक जॉब धरला आहे. तू पण तसा करू शकतेस. ”

मला काही कळेना. ह्या लोकांना काय अपेक्षित आहे होणाऱ्या सुनेकडून? तिने पी. एच. डी करून घरी भाकरी थापाव्या? ? स्वत:च्या मुलीचं पी. एच. डी वाया जाऊ नये

म्हणून जावयाला तडजोड करायला लावली आणि सून आणून तिला घरी बसवणार! ! !

मला अजिबात पटत नव्हतं. पण आत्ता लगेच नकार दर्शवावा की नाही हे मला कळेना. मी विचार केला. बाबांना सगळं सांगेन आणि मग ठरवेन.

पुढे मी त्या मुलाला काही प्रश्न विचारले कुठे राहतोस. एकटा राहतोस तर जेवणाचं कसं करतोस. आवडी-निवडी आहेत का. काय आहेत वगैरे वगैरे . . . माझ्या नशीबाने त्याने व्यवस्थित उत्तरं दिली.

मग माझ्या मामाने त्याला धूम्रपान. मद्यपान आणि मांसाहाराबद्दल विचारलं तसं त्याच्या चेहऱ्यावरचे भाव एकदम बदलले आणि तो जवळपास ओरडलाच. नाही मला असल्या कोणत्याच वाईट सवयी नाहीत. उगाच काहीबाही शंका काढू नका

माझा मामा तर चक्रावलाच. त्याने तर साधा प्रश्न विचारला होता. शंका कोणी घेतली? असो. .

पुढे कोणीच काही प्रश्न विचारले नाही आणि ती मंडळी चहा घेऊन निघून गेली.

कार्यक्रम अगदी व्यवस्थित पार पडला त्यामुळे मामा आणि मावशी खुश होते पण मी मात्र खट्टु झाले. मला वाटलेलं हा मुलगा सगळ्या अर्थाने चांगला होता. पण माझ्या नोकरी आणि पी. एच. डीबद्दल त्यांनी जी काही मतं मांडली त्यावरून मला नव्हती इच्छा त्या मुलासोबत पुढे जाण्याची.

थोड्या वेळाने आईचा फोन आला आणि मी सगळा वृतांत सांगायला सुरूवात केली. . .

## “नवरा” एक खोज - भाग ५

पी. एच. डी स्पेशल कांदा-पोहे कार्यक्रमानंतर माझ्या घरातल्या सगळ्या मामी-मावशी, आत्या, आजी-आजोबा, चुलत-मालत अगदी सगळयांना कळालं की आमच्या घरात 'यंदा कर्तव्य आहे'

मग काय घरी भेटायला येणारा जो-तो मला उपदेशाचे डोस आय मीन मार्गदर्शन करू लागला. अगदी माझ्या मामाची इयत्ता ९वी मधे शिकणारी मुलगी सुध्दा मला म्हणाली की. *'तुला जो मनापासून आवडेल ना त्याच्याशीच लग्न कर. तो तुझ्या आयुष्याचा प्रश्न आहे!* 'मी तर बघतच बसले तिच्याकडे

काय ना हल्लीची मुलं. सरकारने मान्य केलेल्या वयाच्या आधीच कित्ती सुजाण होतात. मला तर इयत्ता ९वी मधे काही कळतही नव्हतं. असो.

तर असे घरातून, दारातून, शेजाऱ्यापाजाऱ्याकडून 'मुलगा कसा शोधावा' इथपासून ते 'सासरी गेल्यावर मुलीने कसं वागावं' इथपर्यंत वेगवेगळया पध्दतीने मार्गदर्शन करणं सुरू झालं होतं.

स्थळ शोधणे मोहीम जोरदारपणे सुरू होतीच. अशातच एक स्थळ आलं. घरच्यांना ठीक वाटलं म्हणून मला चेक करायला सांगितलं. मी भेटण्यासाठी ग्रीन सिग्नल दिला.

ठरलेल्या दिवशी मी अन बाबा त्यांच्या घरी जायला निघालो. रस्ता माहीत नसल्यामुळे ते लोक अर्ध्या वाटेत आम्हांला न्यायला आले होते. घरी पोहोचेपर्यंत

जेवायची वेळ झाली होती म्हणून त्या काकूंनी आम्हांला जेवायलाच वाढलं. जेवण सुध्दा अगदी सणा-सुदीचं गोडाचं केलेलं होतं. जेवणानंतर त्या काकांनी मगई पान हातावर ठेवलं अन ते खाऊन होत नाही की लगेच समोर आईस्क्रीमने भरलेल्या डिशेस! !

मी तर थक्कच झाले ते सगळं आदरातिथ्य बघून! !

जेवतांना सगळ्यांची ओळख झाली होती नंतर मग मी आणि तो मुलगा वेगळं बोलायला म्हणून एका खोलीत गेलो. त्या मुलाने त्याच्या अपेक्षा नीट मांडल्या अन माझं म्हणणं पण अगदी व्यवस्थितपणे ऐकून घेतलं. थोडक्यात महत्त्वाची माहिती एकमेकांना देऊन आम्ही बाहेर येऊन बसलो. ती सगळी मंडळी खुप साधी अन चांगली वाटली. पुन्हा एकदा चहा-पाणी होऊन आम्ही त्यांचा निरोप घेतला. दोन दिवसांनी कळवितो असं त्यांनी सांगितलं अन आम्हांला अर्ध्या वाटेत त्यांच्या कारमधून ड्रॉप केलं उन्हाची वेळ होती म्हणून!

मी तर विचारातच पडले. इतकी साधी-सरळ माणसं पण असू शकतात मुलाकडची मंडळी? ग्रेट यारss

ह्या विचारांसरशी सुखद गारव्याची लहर स्पर्शून गेल्याचा भास त्या टळटळत्या उन्हातही मला झाला

दोन दिवसांनी त्यांनी फोन करून 'योग नाही' असा निरोप दिला. माशी कुठे शिंकली होती कोणास ठाऊक! !

आलेला पहिलाच 'नकार' पचवायला थोडं जड गेलं मला

स्वतःशी विचार सुरू झाला. कुठे अन काय बरं चुकलं असेल? आपण बोललो त्यात तर काही चुकलं नाही ना? काय माहित काय कारण आहे ते. विचारावं का त्या मुलाला तसं? नाही नको. बाबा रागावतील अन असं विचारणं योग्य आहे का?

काही कळत नव्हतं म्हणून मी ताईला फोन केला अन माझ्या डोक्यातले सगळे विचार तिच्यासमोर मांडले. तिला एकूण परिस्थितीची कल्पना होतीच. ती लगेच म्हणाली की, “त्या मुलाने तुला नकार का दिला याचं खरं कारण तर आपल्याला कळू

शकणार नाही. पण हे मात्र नक्की की तुझ्यामधे काही कमी आहे म्हणूनच त्याने असं केलं हे मात्र समजू नकोस. प्रत्येक व्यक्ती ही आपापल्या परीने पूर्णच असते. पण म्हणून कोणत्याही दोन व्यक्ती एकमेकांसाठी योग्य असतील असं जरूरी नाहीये. त्यामुळे तू उगाच मूड ऑफ करून घेऊ नकोस आपण तुझ्यासाठी पुन्हा एखादा चांगला मुलगा शोधू. डोन्ट वरी ”

ते ऐकून माझ्या डोक्यावरचं टेन्शन एकदम पळूनच गेलं

# “नवरा” एक खोज - भाग ६

एखादा नकार तर येणारच हा विचार करून बाबा तर केव्हाच पुढची स्थळं शोधत होते. मग मीही स्वतःला रिफ्रेश केलं पुढच्या 'खोज'मोहिमेसाठी

बाबांनी काढलेल्या लिस्टमधल्या बऱ्याच जणांना आम्ही संपर्क केला. त्यातल्या अर्ध्या लोकांनी उत्तर दिलं नाही. ज्यांनी उत्तर दिलं त्यांनी 'नोकरी करणारी मुलगी नको' अशी *कंडिशन नंतर कळविली. त्यामुळे तेही निकालात निघाले. राहता राहिले दोन जण.

त्यातला एकजण बँगलोरमधला असल्याने त्याच्याशी फोनवर बोलायचं ठरलं. ठरवलेल्या वेळी त्या मुलाने मला मोबाईलवर फोन केला. मला आता थोडीफार सवय झाली होती. त्यामुळे ठरावीक प्रश्नांनी मी सुरूवात केली अन जुजबी माहिती शेअर झाली. त्याही मुलाने साधारण सारखेच प्रश्न विचारले. नंतर त्याने पार्टनर बद्दलच्या अपेक्षा सांगायला सुरूवात केली.

मुलगी दिसायला अगदी सुंदर हवी. ( म्हणजे तुला सामान्य मुलगी नाही ऐश्वर्या नाहीतर कटरिना ऑर करिनाच हवीये )

केस लांब असले तर वेल ॲण्ड गूड पण अगदीच बॉयकट / बॉबकट नसावा (टीपीकल डिमाण्ड ).

तिला चष्मा नकोच कारण आमच्या घरात आम्हांला कोणाला चष्मा नाहीये यूनो. सो. . ( हे काय आहे? ? घरात कोणाला चष्मा आत्ता नाहीये पण उद्या लागणार नाही

याची काय गॅरंटी? ? अन चष्मा असणं काय असाध्य रोगाचं लक्षण आहे का? ? काय रे देवा ही कसली अपेक्षा )

तिने टाईमपास म्हणून नोकरी केली तर चालेल पण मी ऑफिसमधून घरी येण्याआधी ती घरी असायला हवी (हे भगवाssन! मग तिला नोकरी कशाला करू देतो बाबा )

मला खाण्याची खूप आवड आहे तेंव्हा तिने रोज मला नवनविन पदार्थ करून खाऊ घालायला हवेत.

मी मधेच म्हटलं. पण जर तिला स्वयंपाकच येत नसेल तर? ? त्यावर तो म्हटला मग मी कदाचित तिला नापसंत करेन! ! (ग्रेट यार म्हणजे या पोराला करिना कपूरसारखी हिरोईन + नवऱ्याची दारात वाट बघणारी तुलसी + ताज होटेलची शेफ एकत्रितपणे हवीये! ! )

ह्या अपेक्षा ऐकून मी विचारलं की हे सगळं असलेली मुलगी भेटली पण जर तुमचा स्वभाव जुळलाच नाही तर?

त्यावर लगेच तो उत्तरला. स्वभाव काय. मुलींना नवीन ठिकाणी सगळंच जुळवून घ्यावं लागतं. त्याप्रमाणे तिने माझ्या स्वभावासोबत अॅडजस्ट करून घ्यायला पाहिजे! !

मी याउपर काही बोलूच शकले नाही.

त्याने स्वतःच्या अपेक्षांची लिस्ट कंटिन्यू केली. पाचएक मिनीटाने ते सांगून संपल्यावर तो म्हणाला "मी आत्ता काही महिन्यांकरता यू. एस. ला जाणार आहे त्यानंतर भेटू मग आपण. मी येईन तुला भेटायला. अच्छा. ठेवतो मग मी आता." अन फोन बंद! !

काय माणूस आहे हा! स्वतःच्या अपेक्षांची घोडागाडी दौडवून पार आमचं लग्न ठरल्यासारखं मला भेटायला येतो म्हटला अन् फोन बंदपण करून टाकला!! मला आत्ताच त्याने बोलू दिलं नाही. माझं म्हणणं ऐकूनही घेतलं नाही. तो पुढे मला कशी वागणूक देईल?? अन त्याच्या अपेक्षा बघता मी तरी त्याला सूट होणारी नव्हते! !

आश्चर्य एकाच गोष्टीचं वाटलं की आजच्याही काळातील तरूण आपली बायको पिक्चरमधल्या हिरोईनसारखी असावी अशी अवास्तव अपेक्षा ठेवतात? ? ?

सीक यार



# 'नवरा' एक खोज - भाग ७

प्रत्यक्ष भेटी किंवा फोनवरून संपर्क अशा पध्दतीने माझ्यासाठी 'नवरा' या प्राण्याचा शोध घेणं सुरू होतं.

यादरम्यान एका दिवशी माझं नाव नोंदवलेल्या वधू-वर सूचक मंडळाकडून एक मेल आलं.

अमूक एका तारखेला त्यांनी वधू-वर मेळावा आयोजित केला होता. त्यांच्या म्हणण्यानुसार हा मेळावा अगदी टीपीकल नसून वेगळा होता. वेगळेपण कसं? तर फक्त ज्या मुलांना आणि मुलींना 'यंदा कर्तव्य आहे' तेच हा मेळावा अटेंड करू शकतात आणि नाव नोंदवणाऱ्या पहिल्या पन्नास जणांना आणि जणींना ह्यामधे प्रवेश होता. मुख्य आणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे कोणाच्याही पालकांना या कार्यक्रमामधे सहभागी होता येणार नव्हतं.

बाबा म्हटले तुझं नाव नोंदवू. बघ जाऊन तिथे कोणी सापडतो का. मी पण विचार केला एका-एका मुलाला भेटण्यापेक्षा जर पन्नासजणांना एकदाच भेटता येत असेल तर चांगलं आहे.

तर मेळाव्याचा दिवस उगवला. सकाळी ११ची वेळ ठेवण्यात आली होती. त्याप्रमाणे मी दिलेल्या पत्त्यावर पोहोचले. एका मंगल कार्यालयामधेच त्यांनी हा मेळावा आयोजित केला होता. दारामधे मंडळाच्या दोन काकू बसल्या होत्या त्यांनी माझं नाव विचारून मला एक नंबर दिला आणि आतमधे दिलेल्या नंबरच्या ग्रुपमधे जाऊन बसायला सांगितलं.

आत गेल्यावर बरीच मंडळी ग्रुपमधे बसलेली दिसली. मी माझा ग्रुप शोधला आणि येऊन बसले.

आमच्या ग्रुपमधे आम्ही तीन मुली होतो आणि दोन मुलगे बसलेले होते. पाच-एक मिनीटामधे कार्यक्रम सुरू झाला.

एक काका हॉलच्या स्टेजपाशी उभे राहून खणखणीत आवाजात बोलू लागले. मंडळाचा व्यवस्थापक म्हणून त्यांनी स्वतःची ओळख करून दिली आणि हा मेळावा काय आहे आणि कसा वेगळा आहे हे एकवार सांगून आम्ही बसलेल्यांनी नेमकं काय करायचं हे सांगितलं.

प्रत्येक मुलाला आणि मुलीला एक पत्रक दिलं होतं. त्यामधे मेळाव्याला आलेल्या सर्वांची नाव-गाव-पत्ता-फोन नंबर-शिक्षण-पगार वगैरे माहिती होती. प्रत्येक ग्रुपमधे एकूण पाच जण होते. प्रत्येक ग्रुपला एक विषय दिला जाणार आणि त्यावर पाच मिनीटे चर्चा करायचा वेळ दिला जाणार. विषयावर बोलायला सुरूवात करण्याअगोदर प्रत्येकाने स्वतःची थोडक्यात ओळख करून द्यायची. पाच मिनीटे संपली की मुलांनी उठून पुढच्या ग्रुपमधे जाऊन बसायचं आणि परत चर्चा करायची.

जर कोणाला एखादा मुलगा आवडला किंवा मुलगी आवडली तर त्या पत्रकामधे त्या व्यक्तीचा नंबर मार्क करून ठेवायचा. प्रास्ताविक करून काकांनी कार्यक्रम सुरू झाल्याची घोषणा केली.

आमच्या ग्रुपला पहिला विषय मिळाला. मी चिठ्ठीमधे लिहीलेला विषय सगळयांना सांगितला. मग आम्ही सर्वांनी एक-एक करून स्वतःची माहिती दिली आणि चर्चेला सुरूवात केली.

कोणी विशेष काही बोलत नव्हतं. उलट, बसलेली दोन मुलं पत्रकामधे डोकं घालून बसली होती. पहिल्या विषयाचा वेळ संपला तसे ते दोघे उठून दूसऱ्या ग्रुपमधे गेले आणि नवीन दोघे येऊन बसले. त्यातला एकजण अगदी झोपेतून उठून आल्यासारखा आला

होता. चेहऱ्यावर दाढी वाढलेली. डोक्यावरचे केस अस्ताव्यस्त आणि कपडे तर त्याच्या मापाचे अजिबातच वाटत नव्हते इतके ढगळ.

त्याने स्वतःची ओळख करून देतांना मी 'रॉकस्टार' आहे आणि आमच्या रॉक बॅन्डमधे लीड सिंगर म्हणून काम करतो असं सांगितल्यावर त्याच्या अवताराचा अर्थ लागला दूसरा मुलगा त्यामानाने बराच बरा दिसत होता

दिलेल्या विषयापेक्षा इतर गोष्टींवर, म्हणजे एकमेकांबाबत जास्त माहिती मिळवण्याकडे सर्वांचा कल दिसला. पण एक मुलगी अशी होती की ती सारखी सगळयांना आठवण करून देत होती की आपल्याला चर्चा करायला सांगितली आहे तर चर्चा करू, उगाच वेळ संपली तर प्रॉब्लेम होईल. पण तिच्याकडे कोणी जास्त लक्ष दिलं नाही.

असंच बराच वेळ विषय चेंज होत गेले आणि नवनवीन मुलं आमच्या ग्रुपमधे येऊन गेले पण मला कोणी विशेष वाटत नव्हता.

अर्ध्याअधिक मुलांना तर असं मेळाव्यामधे एकदम तीन-चार जणांच्या ग्रुपमधे बोलायचं कसं हे सुचत नव्हतं. मुली त्यामानाने नीट माहिती देत होत्या आणि व्यवस्थित विचारही मांडत होत्या.

काही मुलांचा तर हा सगळा टाईमपास सुरू आहे आणि आज रविवारची सुट्टी कशी वाया गेली असा सूर होता!

काही मुलं व्यवस्थित बोलत होती पण मग त्यांच्या अटी अशा होत्या की, मी त्यामधे बसत नव्हते आणि काही मुलं माझ्यापेक्षा वयाने फारच मोठी होती!

दोन-तीन मुलं अशीही भेटली की ती तिसऱ्यांदा अशा मेळाव्याला आली होती. अगदी सराईतासारखी ती आमचा इंटरव्ह्यू घेत होती

दोन तास हा सगळा सोहळा चालला. वेळ संपली तसं व्यवस्थापक काकांनी माईक परत हातात घेतला आणि घोषणा केली की आता चहा-पान करून घ्या आणि तुम्हाला

जर कोणा मुलाशी/मुलीशी बोलायचं असेल तर त्याला/तिला भेटून चर्चा करा. पाच-एक मिनीटात सर्वजण हातात चहा घेऊन इकडे-तिकडे फिरू लागले.

मी एका कोपऱ्यात उभी राहून मजा बघत होते. हॉलमधे एका ठिकाणी मला बरीच गर्दी दिसली थोडं जवळ जाऊन बघितलं तर. मेळाव्यामधे सर्वात व्यवस्थित दिसणाऱ्या एका मुलाशी तीन-चार मुली बोलायचा प्रयत्न करत होत्या. तो सुध्दा एकदम छाती पुढे काढून प्रत्येकीला अटेंड करत होता. मला मजा वाटली आणि सहज म्हणून मी त्याचा आणि त्या मुलींचा नंबर चेक केला. तो मुलगा आणि त्या सर्व मुलींमधे जवळपास दहा वर्षांचं अंतर होतं!

मला काय कोणाशी बोलायची इच्छा नव्हती म्हणून मी तिथून लगेच बाहेर पडले.

रिक्षा पकडून तडक घरी पोहोचले. घरी सगळेजण माझीच वाट बघत होते. आईने पाणी दिलं आणि लगेच प्रश्नांची सरबत्ती सुरू केली. कसा होता कार्यक्रम. किती जण आले होते. तुला किती आवडले.

त्यातच ताईने विचारलं कोणत्या क्षेत्रातले होते. पगार किती काय. त्यांना उत्तर देईतो बाबा पण घरात आले मग त्यांनी सुरू केलं. पत्रिका आहे का त्या मुलांची. कोणाला बघायची नसेल तर तसं कितीजणांनी सांगितलं वगैरे वगैरे!

आई ग! किती ते प्रश्न! मला कोणीच आवडला नाही असं एकदाच सगळयांना उत्तर देऊन टाकलं मी. ते ऐकून आई-बाबांचा चेहरा खर्रकन उतरला! ताईसुध्दा म्हटली काय? अगं पन्नास पोरांमधून तुला एकही नाही आवडला

मी शांतपणे म्हटलं. खरंच गं ताई मला कोणीच नाही आवडला.

ताई: पण का? ?

मी: एकतर अर्ध्या पोरांना धड बोलता येत नव्हतं. माहिती विचारली तर तत-पप करत होते.

बाबा:(नाराजीच्या सुरात) तू दरडावून विचारलं असणार! मग ते बिचारे घाबरले असतील. कसा आवाज फुटेल त्यांच्या तोंडून!

मी: बाबा! मी एकटीच मुलगी नव्हते काही तिथे. ग्रुपमधल्या इतर मुलींशी बोलतांना पण तीच अवस्था होती त्यांची. एक मुलगा तर अजागळासारखा उठून आला होता. म्हणजे आपण कुठे जात आहोत याचंसुध्दा त्याला भान नव्हतं!

आई: अगं असतात काही मुलं अशी. सगळेच कसे तुझ्यासारखे सगळया बाबतीत पर्टिक्युलर असतील. त्या मुलांना सोडून कोणी दूसरं दिसलं की नाही तुला?

मी: अगं अगदीच कोणी चांगलं नव्हतं असं नाही पण जे ठीक वाटले त्यांच्या अटी फार वेगळया होत्या गं. म्हणजे एक डॉक्टर आहे. त्याचा दवाखाना त्याच्या गावामधे आहे. त्याला त्याची बायको तिथे राहणारी हवी आहे. मग आता मी माझी नोकरी सोडून तिथे कशी शिफ्ट होऊ?

आई: अगं तिथे दूसरी नोकरी बघ ना.  पोरीने नोकरी केलीच पाहिजे असा काही नियम नाहीये!

ताई: आई.  नोकरीबाबत तिने तिचा निर्णय घेणं जास्त योग्य आहे. जर तिला नको वाटत असेल तर आपण बळजबरी करण्यात अर्थ नाही.

मी: अगं आई.  मी एकवेळ नोकरीवर पाणी सोडलं असतं पण तो मुलगा डॉक्टर. आता त्याच्या दवाखान्यामधे मी काय मदत करणार त्याला? एनीवे. बाकी जे ठीक वाटले ते फार म्हणजे अगदी दहा वर्ष मोठे होते माझ्यापेक्षा.  मग मला ते नको वाटलं

बाबा: दहाच वर्ष ना.  त्यात काय होतं. मुलगा चांगला असेल. व्यवस्थित पगार घर-दार असेल तर वयातलं अंतर थोडं जास्त असेल तर काय फरक पडतो!

मी आणि ताई एकदम अवाक झालो ते ऐकून!

आई: अहो काही तरी काय बोलत आहात.  हल्लीच्या काळी नवरा-बायकोमधे इतकं जास्त अंतर नसतं. आपल्या वेळी ठीक होतं. हल्ली ते जनरेशन गॅप का काय ते असतं म्हणतात त्यामुळे! नको इतकं अंतर उगाच!  जाऊ दे गं.  तुला नाही आवडला ना कोणी ठीक आहे. बघू आपण परत शोधू.

बाबा: तू मला एकच गोष्ट सांग. तुला स्वतःला तरी माहित आहे का कसा मुलगा शोधत आहेस तू?? आतापावेतो पन्नास-साठ मुलं बघितलीस, पण तुला एकही ठीक वाटला नाही! बघा. कुठेतरी ॲडजस्टमेंट करायला शिका. सगळंच मनासारखं मिळत नाही प्रत्येकाला. मी शेवटी तिथून उठून माझ्या रूममधे जाऊन बसले



# 'नवरा' एक खोज - भाग ८

रविवारचा प्रसंग झाल्यानंतर मी स्वतःशीच परत एकदा बोलायचा प्रयत्न केला. बाबा म्हटले त्याप्रमाणे मला खरंच माहित होतं का कसा पार्टनर हवा आहे ते? आतापर्यंत भेटलेल्या मुलांपैकी मला कोणीच आवडला नव्हता असं का? मला परत एकदा विचार करायची गरज होती. स्वत:ला विचारायची गरज होती. काहितरी चुकत होतं का? की अजून काही वेगळं कारण होतं

माझा ऑफ झालेला मूड बघून आई म्हटली, “जेव्हा तुझ्या नशिबात असेल तेव्हाच सापडेल तो. उगाच इकडे-तिकडे डोकं आपटून काय होणार! ”

तर ताई परत एकदा समजावत म्हटली की, “इतकं काही तुझं वय झालं नाही. असेल तुझ्यासाठी नक्कीच कोणीतरी. ते म्हणतात ना. स्वर्गात गाठी बांधलेल्या असतात तो समोर आला की तेरे दिमाग मे घंटी जरूर बजेगी” आणि तेवढ्यात माझा भाऊ त्यामधे ॲड करत म्हटला, “आणि हो तुझ्या आजूबाजूला अचानक व्हायोलिनचे सूर वाजू लागतील. . सगळीकडे अगदी प्रकाश भरून उरेल आणि पांढऱ्याशुभ्र घोड्यावर बसून तो राजकुमार तुला घ्यायला येईल. . ” आणि फस्स करून आम्ही सगळे हसत सुटलो

माझ्या मनावरचं मळभ थोडंतरी दूर झालं. पण बाबांनी मात्र मनाशी एक विचार पक्का केला. माझी पत्रिका कुठल्यातरी भटजीला दाखवायची. बाबांनी एकदा मनावर घेतलं की मग ते कोणाचंच ऐकत नाहीत. त्या दबंगच्या चुलबुल पांडेसारखं!

तर बाबांनी लगेच एका भटजीला माझी पत्रिका दाखवली आणि माझ्या लग्नाला उशीर का होत आहे याचा उलगडा झाला. त्या भटजींनी सांगितलं की मुलीच्या लग्नघरात राहू आणि केतूचा वास असल्या कारणाने तिच्या लग्नामधे विलंब होत आहे. यावर उपाय

एकच! तिची नक्षत्रशांती करून घ्या. माझ्याकडे केलीत तर डिस्काऊंटमधे करून देईन अथवा तुम्ही तुमचा ब्राम्हण शोधू शकता!

माझ्या पत्रिकेमधे इतका गोंधळ सुरू असेल अशी कोणालाच कल्पना नव्हती. याचा परिणाम असा झाला की सगळे मला म्हटले. “बाळ तुझी काही चूक नाही जर आतापर्यंत कोणी आवडला नसेल तर. तुझ्या पत्रिकेमधेच प्रॉब्लेम आहे. तू काळजी नको करूस आपण काहीतरी उपाययोजना नक्की करू”

मला एक गोष्ट कळेना. आपल्या ग्रहमालेमधे राहू-केतू नामक कोणताच ग्रह/लघुग्रह किंवा मानवी उपग्रह नाही. मग हे दोन पठ्ठे माझ्या पत्रिकेमधे आले कुठून? बरं ते जरी असले वरती आकाशामधे बसलेले, तरी त्यांचा माझ्यावर इथे पृथ्वीवर, ते पण डायरेक्ट पत्रिकेमधे कसा काय परिणाम होऊ शकतो? आणि जर ती नक्षत्रशांती वगैरे केली तरी त्यांच्या डोक्यावर खरंच अक्षता पडतील. त्यांना दिलेला नैवेद्य चाखून ते खरंच माझ्या लग्नाला संमती देतील

काय यार आजच्या जमान्यामधे अजूनही ह्या गोष्टी का पाळल्या जातात?? मी तर सरळ विरोध दर्शवला आणि स्पष्ट सांगितलं घरच्यांना “मी अशी कोणतीही पूजा करून घ्यायला तयार नाही.” पण शेवटी ते माझे जन्मदाते ना. इमोशनल ब्लॅकमेल करून माझ्याकडून त्यांनी हे कर्मकांड करवून घेतलंच

त्यांच्या दबावाला बळी पडून मी पूजा तर करवून घेतली पण आता मला बघायचंच होतं की भटजींनी दिलेल्या डेडलाईनमधे माझं लग्न होतं की नाही! !

भटजींच्या मते नक्षत्रशांतीची पुजा त्यांनी इतकी पावरफुल्ल बांधली होती की एक महिन्यामधे माझं लग्न झालंच पाहिजे नाहीतर दक्षिणा परत.

घरच्यांना ते ऐकून कोण आनंद झाला पण आतापर्यंत आलेल्या अनुभवामुळे म्हणा किंवा मला कदाचित भविष्य जणू कळालं म्हणा माझा आतला आवाज कुत्सितपणे हसून म्हटला. 'शक्यच नाही. एक महिन्यात काय पुढच्या निदान चार महिन्यांमधे तरी हे

होणार नाही. आत्ताच त्या ब्राम्हणाला म्हणावं की दक्षिणा बाजूला काढून ठेव मी परत घ्यायला येईन

बाकी भटजींनी केलेल्या त्या आकाशवाणीमुळे माझ्या बाबांनी 'वर'संशोधन डब्बल-स्पीडने सुरू केलं. पण काही दिवसांतच मला ऑफिसमधे सांगण्यात आलं की मला तब्बल सहा महिन्यांकरता परदेशी जावं लागणार आहे. हे ऐकलं आणि माझ्या अंतर्मनाने टाळी दिली वर डॉयलॉगही मारला. बघ मी म्हटलं होतं ना

मी घरी आल्यावर ही बातमी ऐकवली आणि सगळं घर एकदम खुश झालं. परदेशी जाण्याची संधी इतकी अलगद चालून आल्यामुळे मी तर हवेत तरंगतच होते. पंधरा दिवसांतच मला निघायचं होतं म्हणून मी आणि आई लगेच याद्या करायला बसलो आणि या सगळयामधे मी 'वरसंशोधन' वगैरे काही सुरू आहे हे पार विसरून गेले.

# 'नवरा' एक खोज - भाग ९

चार दिवसात एका प्रोफाईलच्या वडीलांनी घरी फोन केला. आईने सगळी माहिती विचारली आणि दोन दिवसांत कळवतो म्हणून सांगितलं. मी संध्याकाळी घरी आल्यावर आईने मला त्या मुलाचं प्रोफाईल चेक करायला सांगितलं. फोटो व्यवस्थित होता. द्वीपदवीधर होता. घरच्यांबद्दल-स्वतःबद्दलपण नीट माहिती दिली होती. मला सगळं ठीक वाटलं. मी ठीक आहे म्हटलं.

पण मला तर परदेशी जायचं होतं. मग या मुलाला आत्ता भेटणं ठीक राहील का अशी शंका मी उपस्थित केली. त्यावर सगळयांचं म्हणणं झालं की जाण्याआधी एकदा भेटून बघ. जर ठीक वाटत असेल तर पाहता येईल पुढचं कसं करायचं ते.

मी तयार झाले पण माझी एक अट होती की मी एकटीच जाऊन ह्या मुलाला एखाद्या कॉफीशॉपमधे भेटेन उगाच कंटाळवाणा, टाईमपास कांदा-पोहे प्रोग्रॅम मला नकोय!

वेळेचं गणित बघता आई-बाबा पण तयार झाले.

त्या प्रोफाईलला बाबांनी फोन केला आणि सांगितलं की. मुलांना बाहेर भेटून घेऊ देत.  मग सगळं ठीक वाटलं तर आपण भेटू. पण त्या मंडळींनी गळ घातली की तुम्ही घरीच या. घर पण बघणं होईल आणि आपल्या गप्पा पण होतील. पण बाबांनी ते आग्रहाचं निमंत्रण टाळून निग्रहाने 'बाहेर भेटून घेऊ द्या' हे सांगितलं. मुलाकडची मंडळी म्हटली ठीक आहे आम्ही कळवतो.

दुसऱ्या दिवशी सकाळी त्या मुलाच्या वडीलांनी 'आम्हाला हरकत नाही'चं सर्टीफिकेट दिलं आणि मुलीला स्थळ-काळ-वेळ ठरवण्यासाठी फोन करायला सांगा असा निरोपही दिला.

त्या दिवशी मला ऑफिसमधे काम कमी होतं आणि शुक्रवारचा दिवस होता म्हणून मी त्या मुलाला फोन केला. आज संध्याकाळी ७वाजता अमूक ठिकाणी भेटूया का असा मी प्रस्ताव मांडला. तो म्हटला मी माझं शेड्यूल चेक करून अर्ध्या तासामधे तुला कळवतो.

बरोबर अर्ध्या तासाने त्याचा फोन आला.

पण त्याचं म्हणणं झालं की.

तो: तू सांगितलेली जागा माझ्या ऑफिसपासून १६किमी वर आहे म्हणून आपण १०किमी वर असलेल्या कॉफीशॉप मधे भेटूया का?

मी: पण मला ती जागा माहीत नाही त्यापेक्षा आपण तमुक ठिकाणी भेटलं तर चालेल का?

तो: पण तिथे सीसीडी आहे का?

मी: मला माहीत नाही पण असायला हवं. ते जर नसेल तर दूसरं कॉफीशॉप चालेल का?

तो: हो ठीक आहे. मग भेटू आपण आज संध्याकाळी ७वाजता.

मी: हो ठीक आहे.

मी ऑफिसचं काम आटोपून ६. ५५वा. ठरलेल्या जागी येऊन थांबले. दहा मिनीटे झाली तरी त्याचा फोन नाही म्हणून मी त्याला फोन केला. पहिल्या वेळेस त्याने उचलला नाही म्हणून मी त्याला मेसेज केला मी तिथे पोहोचल्याचा पण तरी काही रिप्लाय नाही आला

दहा मिनीटाने त्याचा फोन आला की. ७. ३०वा. भेटायचं ठरलं होतं आपलं तू इतक्या लवकर का आली आहेस तिथे? ?

मी म्हटलं ७वा. भेटायचं ठरलं होतं! !

तर तो म्हटला पण मी तर आत्ता निघालो आहे ऑफिसमधून. त्यामुळे अजून दहा मिनीटांमधे पोहोचेन.

मी म्हटलं ठीक आहे आता इतका उशीर तर झालाचं आहे. अजून दहा मिनीटे थांबूया. मी गाणे ऐकत त्याच्या फोनची वाट बघत तिथेच बसून राहीले.

दहा मिनीटांनी त्याचा फोन की तू सांगितलेली जागा कुठे आहे? मला सापडत नाहीये गूगल मॅप्सवर. प्लीज मला गाईड कर. मग मी त्याला रस्त्याचं मार्गदर्शन करत शेवटी जिथे ती जागा आहे तिथवर घेऊन आले. हूह! !

बाईक पार्क करून तो मला हाय म्हटला आणि सीसीडीच्या ऐवजी बरिस्ताचं कॉफीशॉप बघून म्हटला, “इथे सीसीडी का नाही??”

मी म्हटलं, “कारण इथे बरिस्ता आहे”

थोडं घुश्श्यातच त्याने माझ्याकडे बघितलं आणि आम्ही आत गेलो. समोर दिसलेल्या टेबलापाशी जाऊन बसलो.

त्याने मला काय घेणार म्हणून विचारलं. मी तिथे असलेल्या मेन्यूपैकी एक शीतपेय सांगितलं. पैसे आणि ऑर्डर देऊन तो येऊन बसला आणि. . ५. . १०. . १५मिनीटे झाली तरी एकही शब्द बोलला नाही!

मी विचार करत बसले की याला झालंय तरी काय हा बोलत का नाही? पण मी वाट बघून इतकी वैतागले होते की म्हटलं जाऊ देत बोलेल तेव्हा बोलेल.

तितक्यात आमच्यासमोर शीतपेयं आली. त्याने पहिला घोट घेतला आणि ओरडतच बोलायला सुरूवात केली

तो: ७. ३०वाजता भेटायचं ठरलं होतं ना मग तू ७वाजता का आलीस? ?

मी: (त्यातल्या त्यात माझा आवाज शांत ठेऊन) पण आपण दुपारी फोनवर जेव्हा बोललो तेंव्हा वेळ ७ ची ठरली होती.

तो: शक्यच नाही. मला चांगलं आठवतंय आपण ७. ३०ला भेटूया असं बोललो होतो!

मी: ठीके. तू ठरवलं होतंस त्याप्रमाणे तू त्याच वेळेला आलास आणि मी माझ्या वेळेला.

इतक्यात त्याचा फोन वाजला. अगदी हळू आवाजात त्याने. 'हो पोहोचलो मी. भेटलो तिला. झालं की कळवतो हं' असं पलिकडच्या माणसाला सांगितलं आणि फोन ठेवला.

तो माझ्यावर असा ओरडेल असं मला अपेक्षितच नव्हतं. त्यातही माझी काही चूक नव्हती आणि असती तरी त्याने असं ओरडायला नको होतं. तरीपण तो मला असं बोलला त्यामुळे मी पण चिडले होते. पण शक्यतो शांत रहावं म्हणून मी नकोच काही बोलायला असं ठरवलं आणि शीतपेयं सीप करत बसले.

तो: (इंग्लीशमधे) तुझे ऑफिस अवर्स कधी संपतात.

मी: (मराठीमधे) कामावर अवलंबून आहे तरीपण माझी शिफ्ट ११ ते ८ असते.

तो: (इंग्लीशमधे) तुझं ऑफिस कुठे आहे? टेक्नॉलॉजी काय आहे तुझी?

मी: (मराठीमधे) . . . .

तो: (इंग्लीशमधे). . पुढचा प्रश्न

तो: (इंग्लीशमधे). . पुढचा प्रश्न

तो: (इंग्लीशमधे). . पुढचा प्रश्न

मी मराठीमधून बोलत असूनही तो सारखा इंग्लीशमधूनच बोलतोय म्हटल्यावर मी पण इंग्लीश सुरू केलं.

तो: तुला ऑस्ट्रेलिया आवडतं का? मी तिकडे शिफ्ट होणार आहे. लोक वेड्यासारखे यू. एस. आणि यू. के. च्या मागे लागतात. पण त्यांना माहीत नाही की ऑस्ट्रेलियामधे किती स्कोप आहे. मला माझ्या गाईडने सांगितल्याप्रमाणे मी व्हिसासाठीची सगळी

प्रोसिजर सुरू केली. त्यामधे इंग्लिशची टेस्ट असते. मग अॅण्टी असते. मग हे असतं. . . ते असतं. . .

मी त्याच्याकडे फक्त बघत बसले होते. त्याच्या इंग्लीशमधे बोलण्याचं कारण मला आत्ता कळालं होतं. त्यामुळे मी म्हटलं संपव बाबा तू तुझं 'ऑस्ट्रेलिया पुराण' मग मी बोलेन.

थोड्या वेळाने त्याने थोडा पॉझ घेतला आणि माझ्याकडे बघितलं. मी एक क्षण ब्लँक झाले. आता काय बोलू?

मग तोच म्हटला. तुला काही प्रॉब्लेम नाही ना तिकडे जायला.

मी: पण मला माहीत नाही माझी कंपनी तिकडे ऑपरेट करते की नाही आणि प्रोजेक्ट नसेल तर कसं मिळेल जायला.

तो: अगं मी तर नोकरी सोडून जाणार आहे तिकडे. तिथे गेल्यावर आरामात नोकरी मिळेल माझा गाईड म्हटला आहे मला.

मी: (मी एकदम उडालेच त्याचं ते वाक्य ऐकून मी सरळ सांगितलं) मी हातातली नोकरी सोडून अशी नाही जाऊ शकत.

तो: पण मला ऑस्ट्रेलियाला जायचंच आहे.

मी: ठीक आहे. पण जर दोघांनी हातातली नोकरी सोडून तिथे जाऊन नव्याने सगळं सुरू करायचा विचार केला तर तिथे राहणार कुठे आणि खाणार काय? तिथे उपयोगी येईल इतका पैसा कसा मॅनेज कसा करणार आहेस तू?

तो: मी आतापर्यंत जितका पैसा कमावला आहे तितका सगळा मी तिकडे नेणार आहे. म्हणजे मग नोकरी लागेपर्यंत व्यवस्था होऊ शकते आणि राहायचं म्हटलं तर माझा गाईड त्याची व्यवस्था लावणार आहे. त्यामुळे कसलीच काळजी करायची गरज नाही

मी: हम्म. पण तरी मला नाही पटत. एनीवे तुला अजून काही विचारायचं आहे का?

तो: तुला काय वाटतं एकत्र कुटुंबाबद्दल? तुला चालेल का? तू ॲड्जेस्ट करू शकशील का?

मी: हो मला काही हरकत नाही. फक्त एकच आहे की. मी लग्नानंतर सुध्दा नोकरी करणार आहे तर कदाचित बाकीच्यांना माझ्या वेळेसोबत ॲड्जेस्ट करावं लागेल.

तो: तुला काय वाटतं फॅमिली कितपत इम्पॉर्टंट आहे?

मी: फॅमिली महत्त्वाची आहेच. पण त्याहीपेक्षा ज्या व्यक्तीसोबत आयुष्य व्यतित करायचं तो जास्त महत्त्वाचा आहे.

तो: म्हणजे तुला असं म्हणायचं आहे का की फॅमिली सेकंडरी आहे?

मी: अर्थातच.

तो: नाही मला नाही पटत! फॅमिली सगळ्यात पहिले आणि मग इंडिव्हियुज्युअल.

मी: सॉरी माझ्यासाठी तरी माझ्या पार्टनरचा स्वभाव आणि त्याचं माझ्या आयुष्यातलं स्थान सगळ्यात महत्त्वाचं आहे आणि त्यानंतर मग त्याचं कुटुंब.

तो: आय थिंक मग आम्हांला चुकीची माहिती मिळाली तुझ्याबद्दल.

मी: काय? माझ्याबद्दल तुला माहित आहे 😳

तो: हो. तुझ्या आईसोबत माझ्या मामाची बहीण शिकली आहे आणि त्यांच्याकडूनच आम्हांला तुझ्याबद्दल कळालं. पण आम्हांला असं सांगितलं गेलं की मुलगी खूप चांगली आहे. शिकलेली आहे आणि मोठ्यांचा आदर करते. पण जर तुझ्यासाठी कुटूंब सेकंडरी असेल तर मग मला नाही पटणार.

त्याचं सगळं ऐकून मी शॉक झाले. पण माझे विचार किंवा मी कोण अन कशी आहे ही गोष्ट मला त्याला आता परत पटवून द्यायची काहीच गरज वाटली नाही. डोक्यातला राग थोपवत मी फक्त म्हटलं.

मी: ठीक आहे. धन्यवाद आपण इथे भेटलात पण परत कधीच भेटू नका. बाय!

कॉफीशॉपमधून बाहेर पडल्या पडल्या मी आईला फोन करून सांगितलं. 'असल्या भांडकुदळ आणि चुकीचं असलं तरी स्वतःचंच घोडं दामटणाऱ्या आणि दुसऱ्याचं म्हणणं न ऐकता आणि समजावून न घेणाऱ्या माणसाशी मला लग्न करायचं नाही



# 'नवरा' एक खोज - भाग १०

सहा महिन्यांचा परदेशदौरा करून घरी आले आणि बाबांनी भलीमोठी यादी माझ्यासमोर ठेवली. यादी कसली विचारा, हं बरोब्बर! ती यादी होती 'यंदा कर्तव्य असणाऱ्या मुलांची'! मी मनातल्या मनात डोक्यावर हात मारून घेतला आणि स्वतःला आठवण करून दिली की हम्म अजून आपला नवरा शोधायचा राहिला आहे, मी विसरलेच होते

हूह! तर मी ती यादी हातात घेतली आणि लॅपटॉप उघडून एकेका मुलाचं प्रोफाईल बघायला सुरूवात केली. जे जे ठीक वाटले त्यांच्या नावावर टीक करून यादी निकालात काढली.

प्रत्येकवेळेस जे तंत्र वापरतो ते यावेळेस नको हा एक विचार मनात आला आणि मी सगळयात आधी ऑनलाईन प्रोफाईल मधे टाकलेला माझा 'टीपीकल' फोटो बदलून मला चांगला वाटलेला साडीतला एकच फोटो लावला

त्यानंतर ठरवलं की डोळे बंद करून कुठल्यातरी एका प्रोफाईलवर क्लीक करायचं आणि त्यालाच फक्त मेल पाठवायचं. पण पूर्वानुभवानुसार जर उत्तर आलंच नाही तर

किती वेळ थांबायचं,  म्हणून जास्तीत जास्त ३आठवडे वाट बघायची आणि पुढच्या मुलाच्या प्रोफाईलकडे वळायचं असं ठरवलं.

मग ठरवल्याप्रमाणे मी एक प्रोफाईल सलेक्ट केला आणि त्याला मेल पाठवून दिलं.

दोन दिवसातच त्या मुलाच्या वडीलांचा घरी फोन आला. त्यांनी माझी पत्रिका अमूक गुण जुळते असं सांगितलं आणि पुढचा काय विचार आहे असं विचारलं.

बाबांना आधीच माहित असल्यामुळे बाबांनी, 'मुलांना एक-दोनदा भेटू द्या म्हणजे कळेल आपल्याला', असं सुचवलं. मुलाचे वडील लगेच तयार झाले. मुलाचा फोन नंबर घेऊन बाबांनी मला त्याच्याशी संपर्क करायला सांगितला.

मी परत एकदा शुक्रवारची निवड केली आणि मुलाला संपर्क करून कुठे भेटायचं, किती वाजता भेटायचं ते ठरवलं. ह्या मुलाने कोणत्याही अंतराचं मोजमाप न-देता, आढेवेढे न-घेता ठरलेल्या वेळेला भेटायचं कबूल केलं. मला थोडं आश्चर्य वाटलं पण हायसंही वाटलं

संध्याकाळी ६वाजताची वेळ ठरली होती आणि मला ५. ५५वा.  त्या मुलाचा मेसेज आला की, मी ठरलेल्या ठिकाणी आलो आहे तू आल्यावर फोन कर.

मी वेळेत पोहोचले आणि त्याला फोन केला. आमची भेट झाल्यावर मॉलमधे असणाऱ्या एका कॉफीशॉपमधे आम्ही जाऊन बसलो.

कॉफीशॉपमधे गेल्यावर मेन्यू कार्ड समोर आलं.

त्याने मला विचारलं की इथे कोणती कॉफी चांगली मिळते?  मी पहिल्यांदाच आलो आहे त्यामुळे माहित नाही.

मला ते ऐकून थोडी मजा वाटली. मी मेन्यू कार्ड हातात घेऊन माझ्या माहितीतली कोणती कॉफी दिसते का ते बघितलं पण मलाही सापडेना तेंव्हा कॉफीशॉप च्या माणसानेच मदत केली

आमच्या गप्पा सुरू झाल्या एकामधून दुसरा, दुसऱ्यातून तिसरा असे विषय निघत गेले आणि फक्त 'अर्धा तास भेटूया' असं ठरवून आलेली मी दीडतासाने फोन वाजल्यावर भानावर आले!

एकमेकांना बाय करून, घरच्यांशी बोलून निर्णय कळवूयात असं म्हणून आम्ही निघालो.

मी स्वतःशीच विचार करत होते की काय झालं आज? दीड तास वेळ कसा निघून गेला कळालंच नाही

खूप दिवसांनंतर दोन मित्र भेटल्यावर जशा मनमोकळया अगदी मनापासून गप्पा होतात तसं काहीसं वाटलं.

आज पहिल्यांदा मी ह्या मुलाला भेटले आणि तरी इतक्या गप्पा का कराव्याश्या वाटल्या आणि तेही कोणत्याच आडकाठीशिवाय? आजपर्यंत इतक्या मुलांना भेटले पण असं कधीच झालं नाही मग आजच का?

कदाचित तो पण खूप गप्पा मारतो म्हणून झालं असेल का? पण माझं मन इतकं आनंदाने का फुलून गेलं आहे, काय असं वेगळं घडलं? मला तो आवडला आहे का? ओह गॉड

पण परत विचार आला की इतक्या घाईघाईने मी निर्णयाप्रत नको पोहोचायला. घरी जाऊन विचार करू, ताईशी बोलू मग खरं उत्तर कळेल.

घरी आले आणि आधी ताईला फोन केला. आम्ही भेटलो तेंव्हापासून ते आम्ही काय अन कशाकशावर चर्चा केली ते सगळं इत्थंभूत सांगितलं. ताई शांतपणे ऐकत होती, शेवटी तिने फक्त एकच विचारलं, तुझं ॲनालिसीस काय आहे त्या मुलाबद्दल? आणि मी सहजपणे बोलून गेले, 'ताई, इतक्या निर्मळ मनाचा आणि निरागस मुलगा मला पहिल्यांदाच भेटला आहे'.

ताई अगदी मनापासून हसली आणि म्हटली, 'तेरी तो घंटी बज गयी बेटाssss, आय थिंक ज्या सहजतेने तुम्ही आज गप्पा केल्या त्यावरून तुम्हांला दोघांनाही पुढे जायला हरकत नाही'.

मी तर उडालेच ते ऐकून

मी परत एकदा तिला विचारलं, 'खरंच तुला असं वाटतंय? '

ताई म्हटली, 'घाई नाही आपल्याला. तुम्ही हवं तर अजून दोन-तीन वेळेस भेटा. जर, तुझं मत आता सांगितल्या पेक्षा वेगळं झालं तर परत आपण विचार करू, हम्म :)'

मी ताईशी बोलून फोन ठेवला पण का कोण जाणे मनामधे असाही विचार आला की, कदाचित तो मुलगा असंच सगळ्या मुलींशी वागत असेल. त्यामुळे जरी मला तो आवडला तरी त्याचं मत काय असेल? तो म्हटला की घरी गेल्यावर कळवेन पण जर त्याने नकार दिला तर? परत माझंच मन मला जागं करत म्हटलं, अगं तो स्वतः म्हटला ना की त्याला अजून एक-दोन वेळेस भेटायला आवडेल म्हणून.

मग परत वाटलं, आता त्याचा फोन येईपर्यंत नकोच विचार करायला.

असं ठरवलं खरं पण माझं मन काही त्याचा विषय सोडायला तयार होईना. रात्रीसुध्दा दोन मिनीटामधे झोपणारी मी संध्याकाळच्या भेटीचा प्रसंग आळवत पडले होते . . रात्री कधी झोप लागली ते कळालं नाही पण दुसऱ्या दिवशी आईने उठवलं तेंव्हा सकाळचे ११ वाजले होते! !

आईने उठवलं आणि माझ्या चेहऱ्यावरून अगदी प्रेमाने हात फिरवत म्हटली, 'त्या मुलाचा थोड्यावेळापूर्वी फोन आला होता. त्याला आणि त्याच्या घरच्यांना सगळं आवडलं आहे. त्याने परत एकदा भेटायला हरकत नाही असं सांगितलं. ' मी तर एकदम खाड्कन जागीच झाले ते ऐकून आणि आईकडे बघतच राहिले. मी स्वप्न तर बघत नाही ना म्हणून स्वतःला चिमटा पण काढून बघितला. पण हो आई खरंच माझ्यासमोर बसली होती आणि अगदी कौतुकाने हसत होती

मी लगेच ताईला फोन करून ही आनंदाची बातमी सांगितली. आम्ही परत भेटल्यावर काय बोलायला हवं ह्याची चर्चा केली आणि तासाभराने त्या मुलाला रविवारी भेटायची वेळ ठरवायला फोन केला.

. . . पुढे आम्ही दोन-तीन वेळेस भेटलो. खूप खूप गप्पा मारल्या. नोकरी, पगार, एकमेकांची स्वप्नं, स्थायिक होण्याचं शहर, आई-बाबा-कुटुंब, नविन नातं आणि अजून भरपूर काही.

भेटीनंतर प्रत्येक वेळेस मी माझं मत तपासून बघत होते पण ते बदललं नाही.

मग काय एके दिवशी आई-बाबा आणि मी त्या मुलाच्या घरी गेलो लग्नाची बोलणी करायला आणि...

फायनली माझं लग्न ठरलं

तर अशी ही साठा-उत्तरांची 'नवराखोज' कहाणी पाचा-उत्तरी सफळ संपूर्ण झाली



# “जिथून पडल्या गाठी”

मित्रहो

कसं वाटलं पुस्तक?

आवडलं असेल यात शंकाच नाही. आयुष्यातल्या एका महत्त्वाच्या वळणावरचे हे अनुभव जवळपास प्रत्येकाच्याच वाट्याला येतात. विवाहासारख्या आनंदाच्या घडीत हे कटू अनुभव सावट आणतात. लोकांच्या डोक्यात काय काय कल्पना असतात एकेक. त्यामुळे मुलींना आणि काही प्रमाणात मुलांनाही लग्न जुळवणं म्हणजे अग्नीदिव्यच असतं. बरेच जण ते सांगत नाहीत. काहीजण अगदी जवळच्या लोकांना सांगतात. तेही निवडून निवडून. घाबरत घाबरत. जशी काही आपलीच काही चूक आहे. त्यामुळेच जेव्हा कोणी प्रांजळपणे आणि स्पष्टपणे, तिखट मीठ न लावता हे अनुभव सांगतं तेव्हा ते वाचणाऱ्याला आपले वाटतात. कार्ल रॉजर्सनी म्हटल्याप्रमाणे “What is most personal is most universal”. प्रियंकाचे हे अनुभव वाचताना वाचकाला अनेकदा पुनःप्रत्ययाचा आनंदही झाला असेल. किंवा याहूनही भन्नाट अनुभव आठवले असतील. सांगावेसे वाटले असतील.

असे काही अनुभव असतील तर कृपया लिहून पाठवा. पुढच्या अंकात अशा अनुभवांवर संग्रह प्रकाशित करणार आहोत. नांव आहे "जिथून पडल्या गाठी". याशिवाय आपल्याला आताच्या विवाह जुळवण्याच्या पद्धतीबद्दल काही लिहायचे असेल तरी आपण लिहू शकता. आपले विचार. आपले अनुभव, आपल्या सूचना. यातून एक मंथन व्हावे, विचारांची देवाणघेवाण व्हावी आणि किंचित का होईना पण विवाह जुळवण्याच्या पद्धतीत काही सुधारणा व्हावी अशी अपेक्षा करू या का? काय सांगावं! यातून एक नवीन पर्व जन्माला येऊ शकतं. लोकांच्या दृष्टीकोनात फ़रक पडू शकतो.

ई साहित्य प्रतिष्ठान च्या वतीने हा नेहमीच प्रयत्न असतो की नवनवीन लेखकांना प्रकाशात यायचा मार्ग मिळावा. दूरदराजच्या वाचकांना छान काही वाचायला मिळावं. आणि त्यासाठी इंटरनेट सारखं एक छान माध्यम मिळालं आहे त्याचा उपयोग जास्तीत जास्त व्हावा. या साध्यासुध्या प्रयोगाला आता एक भव्य आकार मिळाला आहे. पावणे दोन लाख वाचकांना आता आपलं प्रत्येक पुस्तक जातं. आणि वाचक आपापल्या परीने नवीन वाचकांना या चळवळीत आणतात. आपणही आपल्या ओळखीच्या सर्व मराठी लोकांचे ई मेल पत्ते आम्हाला कळवा. त्यांचा वापर फ़क्त पुस्तके पाठवण्यासाठीच होईल याची हमी आम्ही देतो. आपल्या ओळखीच्या लेखकांना आमच्याबद्दल कळवा. एकदा आमच्या वेबसाईटला भेट द्या. www.esahity.com म्हणजे एक खजिनाच आहे. सर्व प्रकारची पुस्तकं तुम्हाला तिथे मिळतील. खुश व्हाल.

आपली भाषा ती आपली. आणि कितीही म्हटलं तरी परकी ती परकीच. आपल्या भाषेत लिहायला, बोलायला आणि ऐकायला, वाचायला जे सुख, जो आनंद मिळतो ते दुसऱ्या भाषेत नाही मिळत. आपल्या घरी जी झोप लागते ती फ़ाईव्हस्टार हॉटेलात लागते का?

चला तर! ही चळवळ वाढवूया. मराठीत अशा तऱ्हेचे प्रयत्न करणारे जे जे आहेत त्या सर्वांना मदत करू या. याही एक प्रकारच्या गाठीच नाही का? वाचक आणि लेखकांना एकत्र आणणाऱ्या!

आपले विश्वासू

टीम ई साहित्य प्रतिष्ठान